100 शताब्दी वर्ष
निर्भीड पत्रकारितेचे शताब्दी वर्ष

R.N.I.No.1814/57

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, शनिवार २१ मे, २०२२ • वर्ष-१००, अंक-७५, पाने-८, किंमत : ₹ ५

• Issue - 75 Vol.- 100 Marathi - Daily - Mumbai, 21 May - 2022 Page- 8 Price- Rs. 5/-

• 24x7 : www.navakal.in संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com


## राज ठाकरेंचा अयोध्या दौरा अखेर स्थगित

पान ३ वर

## सिध्दूला अखेर कोठडीत टाकले

पान ३ वर

## लाल महालात लावणीमुळे संताप

पान ३ वर




शताब्दी वर्ष
निर्भीड पत्रकारितेचे शताब्दी वर्ष
एकमेव स्वतंत्र दैनिक
नवाकाळ
• मुंबई, शनिवार २१ मे, २०२२
• 24x7 : www.navakal.in संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

# सिध्दूला अखेर कोठडीत टाकले



**३४ वर्षांपूर्वीच्या रोड रेज प्रकरणात पंजाब काँग्रेसचे माजी अध्यक्ष नवज्योतसिंग सिध्दूला काल सुप्रीम कोर्टाने एक वर्षाची शिक्षा सुनावली होती. याविरोधात सिध्दूने सुप्रीम कोर्टात धाव घेत क्युरेटिव्ह याचिका दाखल करत तात्काळ सुनावणीची मागणी केली. मात्र सुप्रीम कोर्टाकडूनही त्यांना दिलासा मिळाला नाही. त्यामुळे सिध्दूने सायंकाळी पटियाला कोर्टात आत्मसमर्पण केले. सिध्दूची मेडिकल चाचणी झाल्यानंतर त्याची रवानगी अखेर पटियाला कारागृहाच्या कोठडीत करण्यात आली. आता पटियाला कारागृह सिध्दूचा नवा पत्ता असणार आहे.**

■ पटियाला

पटियाला येथे २७ डिसेंबर १९८८ रोजी कार पार्किंगवरुन नवज्योत सिंग सिध्दूंचे ६५ वर्षीय गुरनाम सिंग यांच्याशी भांडण झाले होते. सिध्दूने त्यांना धक्काबुक्की केली होती. त्यात गुरनाम यांचा मृत्यू झाला होता. ३४ वर्षांपूर्वीच्या या खटल्याप्रकरणी सुप्रीम कोर्टाने सिध्दूला काल १ वर्षाची शिक्षा सुनावली होती. सिध्दूने सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करुन आत्मसमर्पण करण्यासाठी काही आठवड्यांचा वेळ मागितला होता. सिध्दूने त्याच्या छातीत दुखत असल्याचे कारणही पुढे केले होते. त्याचे वकील अभिषेक मनू सिंघवी यांनी या याचिकेवर तात्काळ सुनावणी घ्यावी, अशी मागणी सरन्यायाधीश एन.व्ही.रमणा यांच्याकडे केली होती. मात्र सरन्यायाधीशांनी लवकर सुनावणी घेण्यास नकार दिला. त्यानंतर सिध्दूने आज सायंकाळी पटियाला कोर्टासमोर आत्मसमर्पण केले. सिध्दूची मेडिकल चाचणी आणि अन्य कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यांची रवानगी पटियाला कारागृहात करण्यात आली. याठिकाणी सिद्धूचे कट्टर राजकीय प्रतिस्पर्धी विक्रम मजिठिया सिध्दूचे शेजारी असतील. मजिठिया मादक पदार्थांच्या प्रकरणात कारागृहात बंदिस्त आहेत.

# राज ठाकरेंचा अयोध्या दौरा अखेर स्थगित मात्र पुण्यात सभा घेणार! कारणही सांगणार



**मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचा अयोध्या दौरा आज अखेर स्थगित झाला. आज सकाळी राज ठाकरेंनी स्वत: ट्विट करून ही माहिती दिली. अयोध्या दौरा स्थगित, मात्र पुण्याच्या २२ मे रोजी होणाऱ्या जाहीर सभेत महाराष्ट्र मनसैनिकांनो या, यावर सविस्तर बोलू, असे त्यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले. त्यामुळे राज ठाकरे यांनी ५ जूनचा अयोध्या दौरा रद्द केला असला तरी रविवारी पुण्याची सभा होणार हे स्पष्ट झाले. राज ठाकरे यांच्या निर्णयावर भाजप खासदार बृजभूषण सिंह त्यावर म्हणाले की, माफी न मागणाऱ्या राज ठाकरेंनी जुन्या जखमा ताज्या केल्या आहेत. राज ठाकरे दुर्देवी व्यक्ती आहेत. त्यांच्याकडे एक संधी होती, तीही हुकली. त्यांनी इथल्या संतांची, योगींची, मोदींची माफी मागितली असती तर उत्तर प्रदेशच्या लोकांचा राग कमी झाला असता. पण माफी न मागता त्यांनी जखम पुन्हा ताजी केली आहे. यांनी कोणतीच प्रतिक्रिया दिली नाही.**

■ मुंबई

**राज ठाकरेंच्या** अयोध्या दौऱ्याची घोषणा झाल्यानंतर गेले अनेक दिवस वातावरण तापले होते. राज ठाकरेंनी दौरा जाहीर केल्यावर शिवसेनेने आदित्य ठाकरेंचा दौरा जाहीर केला. त्याचवेळी अयोध्येतील भाजप खासदार बृजभूषण सिंह यांनी साधू-संतांना हाताशी धरुन भव्य मोर्चा काढत राज ठाकरेंच्या दौऱ्याला जाहीर विरोध केला. आधी राज ठाकरेंनी उत्तर भारतीयांची माफी मागावी आणि त्यानंतर त्यांनी अयोध्येत यावे, अशी भूमिका बृजभूषण सिंह यांनी घेतली होती. राज ठाकरे माफी मागत नाहीत तोवर त्यांना अयोध्येत येऊ देणार नाही असे त्यांनी दिल्लीत येऊन बजावले. विशेष म्हणजे महाराष्ट्र आणि इतरही राज्यातील कोणत्याच भाजप नेत्याने त्यांच्या भूमिकेला विरोध केला नाही. यामुळे राज ठाकरेंची अडचण वाढली तरीही अयोध्या दौऱ्यावर जाणारच, असा ठाम इरादा मनसेने केला होता. मनसैनिकांकडून अयोध्या दौऱ्याची जय्यत तयारीही सुरू होती. त्यासाठी पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांची नोंदणी आणि रस्त्यावर पोस्टरबाजी सुरु केली होती. कार्यकर्त्यांसाठी १५ ट्रेन बूक केल्या होत्या. अशा परिस्थितीत आज ट्विट करत राज ठाकरेंनी अयोध्या दौरा स्थगित केल्याचे जाहीर केले. राज ठाकरेंच्या पायाला जखम झाल्याने त्यावर शस्त्रक्रिया होणार असल्याने हा दौरा रद्द केला असे सांगण्यात येत होते. मात्र नेमके काय कारण हे राज ठाकरेच रविवारी सांगणार आहेत.

दरम्यान, शिवसेना खासदार संजय राऊत यांनी याविषयी बोलताना राज ठाकरे आणि भाजपवर बोचरी टीका केली. 'प्रत्येकवेळा भारतीय जनता पक्ष अशा प्रकारच्या खेळी करतं आणि महाराष्ट्रातल्या नेत्यांना त्यांच्या राजकीय स्वार्थासाठी. वापरून घेतं. त्यातलाच हा प्रकार मला दिसतोय, पण ठीक आहे. यातून एक शहाणपण जर काही लोकांना आलं तर बरं होईल', असे ते माध्यमांशी बोलताना म्हणाले. शिवाय आपण भारतीय जनता

» पान ७ वर

## सांगली, जालन्यात वादळी पाऊस केळी, द्राक्ष, डाळिंब बागांचे नुकसान

■ मुंबई

**महाराष्ट्राच्या** जालना, सांगली, सिंधुदुर्ग, सोलापूर, कोल्हापूर, अहमदनगर आदी ठिकाणी मान्सूनपूर्व पावसाने दमदार हजेरी लावली. सांगलीत सलग १४ तास पाऊस पडला. पंढरपुरात सोसाट्याच्या वाऱ्यासह पडलेल्या पावसामुळे केळीच्या बागा आडव्या झाल्या. द्राक्ष, डाळिंब बांगांनाही पावसाचा फटका बसला. महाबळेश्वरमध्ये पाऊस आणि गडद धुके पडले. कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या अनेक भागांमध्ये पाऊस पडला. जालन्यात विजेच्या तारा तुटल्यामुळे शहराचा वीजपुरवठा



खंडित झाला. रत्नागिरी आणि रायगडमध्येही पाऊस पडल्यामुळे उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला.

राज्याच्या अनेक भागांत काल दुपारपासून ढगाळ वातावरण होते. पंढरपूर तालुक्यात सायंकाळपासून वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. त्यात अनेक एकर केळीच्या बागा भुईसपाट झाल्या. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. सांगलीत १४ तास पाऊस पडला. त्याचा मोठा फटका शेतीला बसला. मुसळधार पावसामुळे सांगलीतील नदी नाले, तलाव तुडुंब भरून वाहू लागले होते. तर तीर्थक्षेत्र गुड्डापूरही

» पान ७ वर

## लाल महालात लावणीमुळे संताप

■ पुणे

पुण्यातील लाल महाल ही ऐतिहासिक वास्तू आहे. याच लाल महालात शाहिस्तेखान थांबला होता तेव्हा त्याची बोटं छत्रपती शिवाजी महाराजांनी छाटली होती. छत्रपतींचा हा इतिहास पाहण्यासाठी देशविदेशातून हजारो पर्यटक येथे नतमस्तक होण्यासाठी येत असतात. मात्र पुणे महापालिकेकडून लाल महाल सध्या बंद ठेवण्यात आला आहे. असे असताना याच लाल महालामध्ये आता सोशल मीडियावरील रिल्स तयार करण्यासाठी चक्क लावणी केल्याचा धक्कादायक आणि संतापजनक प्रकार समोर आला आहे. या प्रकारामुळे शिवप्रेमींत संतापाची लाट उसळली असून कारवाईची मागणी होत आहे. इंस्टाग्रामवर रिल्स शेअर करण्यासाठी चक्क लाल महालमध्ये लावणी करण्यात आली. कुलदीप बापट यांनी या रिल्सचे चित्रीकरण केले आहे. तसेच नृत्यांगणा वैष्णवी पाटील यांनी लावणी केली आहे. अशोभनीय आणि धक्कादायक प्रकाराचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

## ज्ञानवापी मशिदीचा निर्णय जिल्हा कोर्टाने घ्यावा- सुप्रीम कोर्ट

■ नवी दिल्ली

**ज्ञानवापी** मशिदीचा वाद काही दिवसांपासून सुरू आहे. या मशिदीत शिवलिंग सापडल्याचा दावा आयोगातर्फे करण्यात आला होता. तर मशिदीतील नंदी समोरील भिंत पाडण्यात यावी, अशी मागणी हिंदू पक्षकारांच्या वतीने वाराणसी कोर्टाकडे करण्यात आली होती. याला विरोध करत मुस्लीम पक्षकारांनी सुप्रीम कोर्टात धाव घेत याचिका दाखल केली होती. या याचिकेवर आज सुप्रीम कोर्टातील ३ न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी खंडपीठाने जिल्हा कोर्टाचे म्हणणे ऐकले पाहिजे. त्यांना सुनावणी पूर्ण करु दे. जिल्हा न्यायाधीशांना २५ वर्षांचा अनुभव आहे. त्यांना आम्ही निर्देश देऊ शकत नाही. त्यामुळे या प्रकरणाचा निर्णय जिल्हा कोर्टाने आपल्या अधिकारानुसार घ्यावा, असे सांगत हे प्रकरण जिल्हा कोर्टाकडे हस्तांतरित करण्याचे आदेश दिले.

सुप्रीम कोर्टात न्यायमुर्ती डी.वाय.चंद्रचूड, न्यायमुर्ती सुर्यकांत आणि न्यायमुर्ती पी.एस. नरसिम्हा या तिघा न्यायमुर्तींच्या खंडपीठात आज ही सुनावणी पार पडली. यावेळी सुनावणीच्या सुरुवातीला सुप्रीम कोर्टाने शिवलिंग असणारी जागा सिल करावी, मुस्लिमांना नमाज अदा करण्यापासून रोखू नये, फक्त २० लोकांनाच नमाज पठण करण्याचा आदेश आता लागू नाही, अशा तीन सूचना केल्या. या सूचना पुढील आठ आठवड्यांसाठी लागू राहतील, असेही कोर्टाने म्हटले. तसेच खालच्या कोर्टाने मुस्लीम गटाच्या अर्जावर लवकरात लवकर सुनावणी घ्यावी आणि विषय निकाली काढावा.

## भरती प्रकरणात लालूंच्या घरांवर सीबीआयच्या १७ ठिकाणी धाडी

■ पाटना

**राष्ट्रीय** जनता दलाचे प्रमुख लालूप्रसाद यादव यांच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे. रेल्वे भरती घोटाळा प्रकरणी सीबीआयने त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात सीबीआयने लालू यादव आणि त्यांची मुलगी मीसा भारती यांची घरे आणि कार्यालये अशा १७ ठिकाणी आज सकाळी ७ वाजल्यापासून धाडी घातल्या. रेल्वेमंत्री असताना झालेल्या भरतीत त्यांनी जमिनींच्या बदल्यात नोकऱ्या दिल्याचा आरोप आहे. या प्रकरणात सीबीआयने ही कारवाई केली.

चारा घोटाळ्यात जामिनावर सुटलेल्या लालूप्रसाद यादव यांच्या विरोधात रेल्वे नोकर भरती घोटाळा प्रकरणी सीबीआयने गुन्हा नोंदवला आहे. २००४ ते २००९ या काळात लालूप्रसाद रेल्वेमंत्री होते. तेव्हा झालेल्या नोकर भरतीत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला होता. त्यांनी जमिनीच्या बदल्यात अनेकांना नोकऱ्या दिल्या होत्या. या प्रकरणात सीबीआयने आज पाटणा व गोपालगंज येथील लालूप्रसाद यादव आणि त्यांची मुलगी मीसा भारती यांच्या १७ ठिकाणांवर छापे घातले.

## 'ॲट्रॉसिटी' प्रकरणी केतकी चितळेला ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली

■ ठाणे

**अभिनेत्री** केतकी चितळेच्या अडचणीत आणखी भर पडली असून 'ॲट्रॉसिटी' प्रकरणी अटकेत असलेल्या केतकीला ठाणे सत्र न्यायालयाने ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. ठाणे मध्यवर्ती कारागृहातून तिला रबाळे पोलिसांनी गुरुवारी ताब्यात घेतले होते. त्यानंतर तिला आज न्यायालयात हजर करण्यात आले.

राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्याविरोधात आक्षेपार्ह पोस्ट लिहिल्याप्रकरणी केतकीला पोलिसांनी अटक केली आहे.



मुंबईसह राज्यातील इतर जिल्ह्यांमध्येही तिच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी सत्र न्यायालयाने तिला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली होती. अशात २०२० मध्ये दाखल झालेल्या 'ॲट्रॉसिटी' च्या गुन्हा प्रकरणी रबाळे पोलिसांनी गुरुवारी कारवाई करत तिला ठाणे कारागृहातून ताब्यात घेत अटक केली. आज ठाणे न्यायालयात हजर केले असताना तिची पाच दिवसांसाठी पोलीस कोठडीत रवानगी केली. तिने २०२० मध्ये सोशल मीडियावर अनुसूचित जातींच्या व्यक्तींविरोधात आक्षेपार्ह पोस्ट केली होती.

## यावर्षी मान्सून शनिवारी अरबी समुद्रात पोहोचणार

■ मुंबई

**महाराष्ट्रासाठी** खुशखबर आहे. उद्यापर्यंत मान्सून अरबी समुद्रात पोहोचण्याचा अंदाज आहे. यंदा नियोजित वेळेपेक्षा तब्बल सहा दिवस आधी म्हणजेच १६ मे रोजी मोसमी वारे सक्रिय झाले आणि अंदमानात मान्सून दाखल झाला. तर, पुणे हवामान विभागाचे मुख्य वैज्ञानिक के. एस. होसाळीकर यांनी गुरुवारी ट्विट करून म्हटले की, उपग्रह आणि भारतीय हवामान विभागाच्या गोवा रडारने दिलेल्या माहितीनुसार पश्चिम किनारपट्टीवर मान्सूनच्या ढगांची गर्दी वाढतेय. याचा अर्थ मान्सून सध्या वेगाने महाराष्ट्राच्या दिशेने वाटचाल करतोय. बंगालच्या उपसागरातून येणाऱ्या वाऱ्यांच्या प्रभावामुळे देशातल्या पूर्वोत्तर आणि दक्षिणेकडच्या राज्यांमध्ये काही भागात सध्या जोरदार पूर्वमोसमी पाऊस होतोय. महाराष्ट्रातसुद्धा काही भागांमध्ये पावसाने हजेरी लावली आहे. तसेच कोकण किनारपट्टीसह राज्यातील अनेक भागांमध्ये पुढील तीन दिवस पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

## कांदा उत्पादक पुन्हा संकटात

### किलोमागे फक्त ५ पैशाचा भाव

■ नाशिक

**कांद्याने** पुन्हा एकदा शेकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आणले आहे. कांद्याला कवडीमोल भाव मिळत असल्याने शेतकरी हतबल झाला आहे. आज महाराष्ट्र आणि गुजरातमधील शेतकऱ्यांना सरासरी एक ते चार रुपये किलो दराने कांदा विकावा लागत आहे. निफाडच्या विंचूरमध्ये कांद्याने शेतकऱ्यांना अक्षरशः रडवले आहे. तर गुजरातमध्येही कांदा उत्पादक शेतकऱ्यांची अवस्था वाईट झाली आहे.

दरम्यान, शेतकऱ्यांना चांगले दिवस आल्याचे चित्र दिसत होते, परंतु खऱ्या परिस्थितीचा विचार केला तर आजही शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळत नाही. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये कांदा उत्पादक शेतकऱ्यांना एक ते दोन रुपये किलो दराने माल विकावा लागत आहे, तर गुजरातचीही अवस्था वाईट आहे. येथील अनेक मार्केटमध्ये कांद्याचे भाव अत्यंत कमी दरात जात आहेत. शेतकऱ्यांना २ ते ४ रुपये किलो



प्रमाणे कांदा विकावा लागत आहे. तर काही ठिकाणी शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणलेल्या लहान कांद्याला ५१ रुपये क्विंटल म्हणजेच किलोमागे फक्त ५ पैशांचा भाव मिळाला आहे. त्यामुळे हताश झालेल्या शेतकऱ्यांनी आपला कांदा पुन्हा घरी आणला. उत्पादन खर्च दूरच राहिला. वाहतूक खर्चही परवडत नसल्याने शेतकरी रडकुंडीला आला आहे. गुजरात हे देशातील चौथ्या क्रमांकाचे कांदा उत्पादक राज्य आहे. गुजरातमध्ये देशातील ८.२१ टक्के कांद्याचे उत्पादन होते. बाजारभावावरून कांदा उत्पादक शेतकऱ्यांची अवस्था वाईट झाली आहे. दरम्यान, कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा प्रश्न मांडणारे भरत दिघोळे यांच्या मते, महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि गुजरातसारख्या अनेक राज्यांमध्ये कांद्याला कमी भावामुळे वर्षानुवर्षे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. यंदा बहुतांश शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही मिळत नाही.

## मेकरकोट परिसरातील बोगद्याचा भाग कोसळला

■ श्रीनगर

**जम्मू-श्रीनगर** महामार्गावरील मेकरकोट परिसरातील खूनी नाला येथील एका बोगद्याचे काम सुरू असताना आज सकाळी बोगद्याचा काही भाग कोसळल्याची घटना घडली. या घटनेनंतर सुरू केलेल्या बचाव मोहिमेत २ जणांची सुटका करण्यात आली असून सात जण अजूनही बोगद्यात अडकले आहेत. बोगद्यात अडकलेले लोक बोगद्याचे ऑडिट करणाऱ्या कंपनीचे कर्मचारी आहेत. या बोगद्याचे काम सुरू होते. त्यामुळे अचानक बोगद्याचा भाग कोसळला. ही घटना घडली तेव्हा बोगद्यासमोर बुलडोझर आणि ट्रकसह अनेक मशीन आणि वाहने उभी होती. बोगदा कोसळल्याने त्यांचेही पूर्ण नुकसान झाले आहे. तसेच बोगद्याच्या ढिगाऱ्याखाली सात जण अडकले असल्याची माहिती मिळत आहे. रामबनचे पोलीस उपायुक्त मसरतुल इस्लाम आणि एसएसपी मोहिता शर्मा हे घटनास्थळी पोहोचले आहे.

ग्राहकांच्या मागणीखातर सवलत सुरूच...
सोन्याच्या दागिन्यांची मजुरी
प्रति ग्रॅम रु. 399/-
आजच नोंदणी करा. सवलत मर्यादित कालावधीसाठीच.
तीच क्वॉलिटी, तोच परंपरागत विश्वास आणि सचोटीचा व्यवहार, हॉलमार्कच्या शुध्दतेसह.
वामन हरी पेठे
सराफ
ही योजना फक्त दादर दुकानासाठीच. डेबिट / क्रेडीट कार्डसाठी ही योजना लागू नाही.
रानडे रोड, दादर (प). फोन: 24362676 9833176699
दुकानाची वेळ सकाळी 11:30 ते संध्या 8:00, सोमवारी बंद

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥



# निसर्गाचा सहवास हाच जगण्याचा आत्मविश्वास

आंतरराष्ट्रीय स्तरावर काही दिवस विशेषत्वाने साजरे होतात. ज्यामधून जनजागृती हा उद्देश तर असतोच त्यासोबत निसर्ग आणि मनुष्याला उपयुक्त ठरणाऱ्या प्राचीन अर्वाचिन साधनसंपत्तीच्या संरक्षणाचाही हेतू असतो. विशेषतः संपूर्ण जगाला अनेकानेक समस्या भेडसावत आहेत. अशावेळी निसर्गाची साथ सोडून चालणार नाही. याचीदेखील आता सर्वानाच हळूहळू खात्री पटू लागली आहे. निसर्गाचा सहवास हाच जगण्याचा आत्मविश्वास असा एक विचार दृढमूल होताना दिसतो. मग अगदी वन्यजीवन कसे टिकवून ठेवता येईल. पशुपक्षी, प्राणी यांचीदेखील कशी काळजी घेता येईल. वृक्ष तोड थांबवून जंगले कशी टिकवता येतील. अशा एक ना अनेक उद्दिष्टांसाठी जागतिक स्तरावर काही दिवस साजरे होत असतात. याच दृष्टीकोनातून दरवर्षी १९ मे हा जागतिक मधमाशा दिन म्हणून साजरा होतो. याचा अर्थ मधमाशीसारखा एक छोटासा प्राणीदेखील निसर्गाचा किंवा एकूणच जीवसृष्टीचा महत्त्वाचा घटक मानला गेला आहे. याच पध्दतीने जागतिक चिमणी दिवस, जागतिक व्याघ्र दिवस, पाळले जात असतात. भारतात या दिवसांच्या निमित्ताने जनजागृती केली जाते. परंतु एकूणच निसर्ग किंवा वन्यजीवनाचा वेध घेतला तर त्याचा होणारा ऱ्हास हा चिंतनजनक ठरू लागला आहे. प्रचंड वेगाने होणारे शहरीकरण, औद्योगिकरण आणि त्यासाठी उभारण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा या निसर्ग किंवा वन्यजीवनाला धक्का लावत असल्याचे म्हणता येईल. निसर्ग, जंगले किंवा वन्यप्राणीजीवन हे संवर्धित होत राहिले तरच एकूण निसर्गाचाही समतोल राहू शकतो. म्हणूनच मधमाशीपासून ते अगदी हत्तीपर्यंत अशा प्राण्यांच्या संरक्षणाचा जागतिक पातळीवर विचार होत असतो. परंतु दिवसेंदिवस या सगळ्याच प्राण्यांच्या संख्येमध्ये घट होते आहे. हे वन्यजीव टिकवायचे कसे यावियषीसुध्दा जागतिक पातळीवर विचारमंथन सुरु झालेले आहे. मग अगदी जागतिक स्तरावरच्या काही मोठ्या संस्था एकमेकांना आर्थिक मदत देत असतात. त्या त्या देशातील निसर्ग संपदा टिकवून ठेवण्याकरिता आदानप्रदानही करीत असतात.

### मधाचा मधाळ महाराष्ट्र

भारतासारखा क्षेत्रफळाने मोठा असलेला देश अनेक प्रकारच्या नैसर्गिक साधनसंपत्तीने नटलेला आहे. किंबहुना भारत हा जगातील एकमेव देश असू शकतो. की जो समशितोष्ण कटिबंधामध्ये मोडतो. म्हणजे या देशातल्या कोणत्याही भागात वर्षभर काय पण सहा महिनेसुध्दा सलग हिवाळा, पावसाळा किंवा उन्हाळा नसतो. जगातल्या इतर अनेक देशांमध्ये मात्र हे प्रमाण विषम असल्याचे पहायला मिळते. एकाअर्थी भारताला लाभलेले हे हवामानाचे नैसर्गिक वरदान खूप वैशिष्ट्यपूर्ण म्हणता येईल. म्हणूनच इथल्या निसर्गाला संवर्धित करण्याचा तितकाच मोठा प्रयत्न गरजेचा ठरतो. अगदी जागतिक मधमाशा दिनाच्या निमित्ताने तरी या मुद्याचा विचार केला तर छोट्याशा मधमाशीचे निसर्गातले योगदान आणि तिचा एकूण मनुष्यासाठी होणारा उपयोग याचे मूल्य खूप मोठे आहे. वेगवेगळ्या फुलांमधला मकरंद शोषून पोळ्यांमध्ये गोळा करणारी मधमाशी आणि त्या मधाचा मनुष्याला होणारा उपयोग या गोष्टी वेगळ्या सांगण्याची आवश्यकता नाही. परंतु निसर्गाच्याच रचनेमधून मधनिर्मितीचा कितीतरी मोठा मधूर सोहळाच घडून येत असतो. हे मध आयुर्वेदिकदृष्ट्या खूप मोलाचे ठरते. कोणत्याही कष्टाशिवाय आणि केवळ मधमाशीच्या जगण्याच्या प्रक्रियेतून घडून येणारा हा एक चमत्कारच ठरतो. अशी ही मधमाशी जगली पाहिजे. वाढली पाहिजे. तिचा ऱ्हास होऊ नये या उद्देशानेच हा जागतिक मधमाशा दिवस पाळला जातो. भारतातल्या वेगवेगळ्या जंगलांमधून मधाचे संकलन होत असते. परंतु यातली दिलासा आणि अभिमानास्पद बाब अशी आहे की महाराष्ट्राने या मधमाशांच्या संवर्धनाकरिता जो पुढाकार घेतला तो लक्षात घेण्याजोगा आहे. मधमाशा टिकणे म्हणजेच फुलपाखरांना जीवदान देण्यासारखेसुध्दा ठरते. महाराष्ट्र सरकारने यासंदर्भात महाबळेश्वरला वेगळ्या मधसंचालनालयाची स्थापना केली होती. कारण तिथल्या जंगलांमधून मध संकलित करता येऊ शकते. ही नैसर्गिक देणगी समजून मधमाशी पालनासारखा एक नवा व्यवसाय शेतकऱ्यांसाठीसुध्दा उपलब्ध करून दिला गेला. सर्वाधिक मधमाशा असलेले आणि मधाचे उत्पादन करणारे गाव म्हणून महाबळेश्वर तालुक्यातल्या मांधर या गावाची यापूर्वीच निवड झालेली आहे. त्याला मधाचे गाव अशी बिरुदावलीही प्राप्त झाली आहे.

### संवर्धनाचे व्रत

स्वाभाविकपणे महाराष्ट्राने आताही मधाचे गाव संकल्पना इतर जिल्ह्यांमध्येही राबवण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. जर त्याचा व्यवस्थितपणे विस्तार केला गेला तर दुधाचा महापूर म्हणून ओळख असणारे महाराष्ट्र मधाचे मधाळ राज्य म्हणूनही लौकिक प्राप्त करू शकतो. म्हणजे वन्य जीवनांच्या किंवा प्राण्यांच्या संवर्धनातून किती विविध प्रकारचा दृष्टीकोन विकसित होऊ शकतो हे या छोट्याशा उदाहरणातून स्पष्ट होते. मात्र याकरिता तितकयाच कठोर परिश्रमांची आवश्यकता आहे. सह्याद्री, सातपुडासारख्या विशाल पर्वतरांगा काही प्रमाणात विंध्य पर्वताचा काही भाग महाराष्ट्रालाही प्राप्त होतो. अशा या वनसंपत्तीचा महाराष्ट्राला लाभलेला वारसा कल्पक अशा नव्या संकल्पनांना प्रत्यक्षात आणू शकतो. पुराणांमधल्या कथेत असे म्हटले जाते की दत्तात्रेयांनी जे चोवीस गुरु केले होते त्यात मधमाशीलाही त्यांनी गुरु केले होते. कारण कष्ट करून मध संकलित करण्याचा आणि त्यातून इतरांच्या जीवनात गोडवा निर्माण करण्याचा मधमाशीच्या या स्वभावाकडून खूप काही शिकता येण्यासारखे आहे. असा दृष्टांत त्यांनी या माध्यमातून सांगितला होता. याच पध्दतीने जर विचार केला तर निसर्गातल्या कितीतरी गोष्टी अशा आहेत की ज्या मनुष्याला वरदान ठरतात. तो त्यांच्याकडून खूप काही शिकू शकतो. कारण आज अनेक प्रकारच्या आधुनिक खतं आणि कीटकनाशकांमुळे मधमाशीसारखे जीवजंतूही नाहीसे होऊ लागले आहेत. हे धोके लक्षात घेऊन वन्यजीवनाच्या संवर्धनाचे व्रत सांभाळले गेले पाहिजे.

# भारताच्या पी.व्ही. सिंधूची थायलंड ओपनच्या उपांत्य फेरीत धडक

**भारताची बॅडमिनपटू पी.व्ही. सिंधूने आज थायलंड ओपन स्पर्धेत दमदार कामगिरी करत जपानची बॅडमिंटनपटू अकाने यामागुचीला मात देत उपांत्य फेरीत धडक मारली आहे. आता शनिवारी उपांत्य फेरीत सिंधूची लढत चीनची चेन युफेई हिच्यासोबत असेल.**

■ जकार्ता

**सर्वात** आधी पहिल्या सेटमध्ये सिंधूने सुरुवातीपासून आपला दबदबा कायम ठेवत २१-१५ च्या फरकाने सेट जिंकला. त्यानंतर दुसऱ्या सेटमध्ये जपानच्या अकाने हिने पुनरागमन करत २०-२२ च्या फरकाने सेट जिंकला. पण अखेरच्या सेटमध्ये सिंधूने दमदार कामगिरी करत निर्णायत सेट २१-१३ या चांगल्या फरकाने आपल्या नावे करत सामनाही नावे केला.

दरम्यान थायलंड ओपन स्पर्धेत अन्य भारतीय खेळाडूंना साजेशी कामगिरी करता आलेली नाही. सिंधू ही एकमेव मैदानात राहिली असून तिच्या आजच्या विजयामुळे भारताच्या पदकाची संधीही जिवंत राहिल्या आणि कांस्यपदक निश्चित केले.

# बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये निखात झरीनचा सुवर्ण पंच

■ नवी दिल्ली

**महिलांच्या** जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये भारताला ४ वर्षानंतर सुवर्णपदक मिळाले. भारताची महिला बॉक्सर निखात झरीन हिने हा इतिहास रचला. काल, गुरुवारी जागतिक बॉक्सिंग स्पर्धेच्या ५२ किलो वजनी गटात थायलंडची बॉक्सर जितपॉन्ग जुटामासचा ५-० असा पराभव करत निखातने सुवर्णपदकावर नाव कोरले. ती जागतिक बॉक्सिंगमध्ये सुवर्णपदक मिळवणारी पाचवी भारतीय महिला ठरली आहे. भारताने या स्पर्धेच्या इतिहासात हे १० वे सुवर्णपदक पटकावले असून त्यापैकी ६ पदक एकट्या मेरीकोमने जिंकले आहेत. तर, सरिता देवी, जेनी आरएल आणि लेखा सी यांनीदेखील सुवर्णपदक पटकावले आहेत. तेलंगणाच्या निझामाबाद येथे १४ जून १९९६ रोजी निखातचा जन्म झाला. या सुवर्णकन्येने वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी बाक्सिंग ग्ल्बसशी मैत्री केली.

बृहन्मुंबई महानगरपालिका

## ई-निविदा सूचना

| | |
|---|---|
| विभाग | वैद्यकीय अधीक्षक, जीटीबी रुग्णालये |
| डिव्हिजन | टीबी रुग्णालयांचा गट |
| बोली क्र. | ७२०००३१७५५ |
| विषय | जीटीबी रुग्णालये, शिवडी मध्ये विविध ठिकाणी टी.पी.सी.एस.ची कामे करणे. |
| ई-निविदा विक्री | दि. २१.०५.२०२२ रोजी स. १०.०० वाजेपासून ते दि. २८.०५.२०२२ रोजी दु. १६.३० वाजेपर्यंत. |
| बोली पूर्व सभा | लागू नाही |
| उघडण्याचा दिनांक आणि वेळ - पाकीट 'अ' पाकीट 'ब' | ३१.०५.२०२२ रोजी १५.०१ वाजेनंतर<br>३१.०५.२०२२ रोजी १५.११ वाजेनंतर |
| पाकीट 'क' उघडण्याचा दिनांक आणि वेळ - | ०६.०६.२०२२ रोजी १२.०० वाजेनंतर |
| वेबसाईट | http://portal.mcgm.gov.in |
| संपर्काची व्यक्ती अ- नाव | वैद्यकीय अधीक्षक, जीटी रुग्णालये |
| ब- दूरध्वनी (कार्यालय) | ०२२-२४१४६९९५ |
| क- मोबाईल क्र. | ०२२-२४१४६९९५ |
| ड- ईमेल पत्ता | Msgtb2012@gmail.com |

सही/-
पीआरओ/३२०/जाही./२०२२-२३ वैद्यकीय अधीक्षक, जीटीबीएच

स्वमर्जीने औषधोपचार करू नका.

## लान्सर कंटेनर लाईन्स लिमिटेड

सीआयएन - L74990MH2011PLC214448

नोंद. कार्यालय: मयुरेश चेंबर्स प्रिमायसेस को-ऑप. सोसायटी लि. प्लॉट क्र. ६०, युनिट क्र. एच०२-२, एच०२-३, एच०२-४, सेक्टर-११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४. । दूरध्वनी क्र. +९१ २२ २७५६६९४०/४१/४२, ईमेल: secretarial@lancerline.com, वेबसाईट: www.lancerline.com

**दि. ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि वर्षाकरिता स्वतंत्र लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचे विवरणपत्र**

₹ लाखात

| अ. क्र. | तपशील | संपलेले त्रैमासिक | | | संपलेले वर्ष | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | लेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| | | ३१.०३.२०२२ | ३१.१२.२०२१ | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२२ | ३१.०३.२०२१ |
| १ | कार्यातून एकूण उत्पन्न | २१,८६६.३७ | १५,४१८.२८ | ११,२२२.६२ | ५९,७३५.०० | ३०,१००.१४ |
| २ | कालावधीकरिता निव्वळ नफा /(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबींपूर्व) | १,५६७.५१ | १,१०४.८५ | २५३.३५ | ३,७२९.८८ | १,१८२.२४ |
| ३ | कालावधीकरिता करपूर्व निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबींपश्चात) | १,५६७.५१ | १,१०४.८५ | २५३.३५ | ३,७२९.८८ | १,१८२.२४ |
| ४ | कालावधीकरिता करपश्चात निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असामान्य बाबींपश्चात) | १,११८.६० | ८०१.३५ | २००.२९ | २,७११.०१ | ८७७.६८ |
| ५ | कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता नफा/(तोटा) (कर पश्चात) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (कर पश्चात) समाविष्ट) | १,१०१.४९ | ८०१.३५ | १९६.०३ | २,६९३.९२ | ८७४.५६ |
| ६ | सम भाग भांडवल | ३,०१४.११ | ३,०१४.११ | ३,०१४.११ | ३,०१४.११ | ३,०१४.११ |
| ७ | राखीव (पुनर्मूल्यांकित राखीव वगळता) गत वर्षाच्या लेखापरिक्षित ताळेबंदामध्ये दर्शविल्यानुसार | - | | | - | - |
| ८ | प्रति भाग उत्पन्न (असामान्य बाबींपूर्वी आणि पश्चात)(दर्शनी किंमत रु. १०/- प्रत्येकी) मूळ आणि सौम्यीकृत | ३.७१ | २.६६ | ०.६६ | ८.९९ | २.९१ |

**दि. ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि वर्षाकरिता एकत्रित अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचे विवरणपत्र**

₹ लाखात

| अ. क्र. | तपशील | संपलेले त्रैमासिक | | | संपलेले वर्ष | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | लेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| | | ३१.०३.२०२२ | ३१.१२.२०२१ | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२२ | ३१.०३.२०२१ |
| १ | कार्यातून एकूण उत्पन्न | २३,५४७.१५ | १५,९२०.२९ | १२,२०९.८४ | ६४,३३०.२८ | ३१,४०३.५९ |
| २ | कालावधीकरिता निव्वळ नफा /(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबींपूर्व) | १,६३०.७६ | १,१५१.२७ | ३५०.९४ | ३,९८६.९५ | १,३११.३९ |
| ३ | कालावधीकरिता करपूर्व निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबींपश्चात) | १,६३०.७६ | १,१५१.२७ | ३५०.९४ | ३,९८६.९५ | १,३११.३९ |
| ४ | कालावधीकरिता करपश्चात निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असामान्य बाबींपश्चात) | १,१६३.१८ | ८३३.२७ | २६३.३० | २,८९५.२८ | ९७०.९२ |
| ५ | कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता नफा/(तोटा) (कर पश्चात) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (कर पश्चात) समाविष्ट) | १,१४६.०८ | ८३३.२७ | २५९.०५ | २,८७८.१९ | ९६७.८० |
| ६ | सम भाग भांडवल | ३,०१४.११ | ३,०१४.११ | ३,०१४.११ | ३,०१४.११ | ३,०१४.११ |
| ७ | राखीव (पुनर्मूल्यांकित राखीव वगळता) गत वर्षाच्या लेखापरिक्षित ताळेबंदामध्ये दर्शविल्यानुसार | - | | | | |
| ८ | प्रति भाग उत्पन्न (असामान्य बाबींपूर्वी आणि पश्चात)(दर्शनी किंमत रु. १०/- प्रत्येकी) मूळ आणि सौम्यीकृत | ३.८६ | २.७६ | ०.८७ | ९.६१ | ३.२२ |

१) वरील विवरण हे सेबी (सूचीबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अन्वये बीएसई लि.कडे दाखल करण्यात आलेल्या अलेखापरिक्षित त्रैमासिक आणि अर्ध वार्षिक वित्तीय निष्कर्षाच्या विस्तृत प्रारुपाचा सारांश आहे. अलेखापरिक्षित त्रैमासिक आणि अर्ध वार्षिक वित्तीय निष्कर्षाचे विस्तृत प्रारूप स्टॉक एक्सचेंज वेबसाईट (www.bseindia.com) आणि कंपनीची वेबसाईट www.lancerline.com वरही उपलब्ध आहे.

संचालक मंडळाकरिता आणि त्यांच्या वतीने
लान्सर कंटेनर लाईन्स लिमिटेड
सही/-
अब्दुल खालिक चटईवाला
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन: ०१९४२२४६

ठिकाण: बेलापूर, नवी मुंबई
दिनांक: २० मे, २०२२

## THE MAHARASHTRA STATE CO-OP. BANK LTD., MUMBAI

(Incorporating The Vidarbha Co-op. Bank Ltd.)
Scheduled Bank
Sir Vithaldas Thackersey Smruti Bhavan,
9, Maharashtra Chamber of Commerce Lane, Fort, Mumbai - 400 001

**TENDER NOTICE**

We invite Sealed Quotations for **"Structural repair, Interior, Civil, Electrical, CCTV, Fire Fighting work at Versova, Andheri (W) Branch.**
**Last Date of Submission : 27-05-2022**
**For Details, Please Visit our website http://www.mscbank.com**

Sd/-
Date : 21-05-2022 (Dr. Ajit R. Deshmukh)
Place : Mumbai Managing Director

## निकाल — गणेशलक्ष्मी धन विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत संध्या. 5:00

सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 20 • तिकीट किं. रु.10/- • सोडत दिनांक 20/05/2022

| | | |
|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10000/- | MG-08 : 6287 | |
| | सर्व मालिकांसाठी • सर्व मालिकांसाठी | बक्षिस |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | जिंकले 2630 रु 5000 ची 5 बक्षिसे जिंकली | रु 5000 ची 5 बक्षिसे जिंकली — श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई (5 बक्षिसे) |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | जिंकले 6480 रु 2000 ची 5 बक्षिसे जिंकली | रु 2000 ची 5 बक्षिसे जिंकली — किशोर लॉटरी सेंटर, सांगली (5 बक्षिसे) |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | जिंकले 1707 रु 1000 ची 5 बक्षिसे जिंकली | रु 1000 ची 5 बक्षिसे जिंकली — प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स - कल्याण (5 बक्षिसे) |

पाचवे बक्षिस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाचवे बक्षिस रु. 400/- सर्व मालिकांसाठी | | 1761 | 2508 | 3088 | 3669 | 4241 | 6065 | 6657 |
| | | 1909 | 2512 | 3093 | 3698 | 4482 | 6078 | 6676 |
| | | 2019 | 2541 | 3135 | 3793 | 5095 | 6275 | 6734 |
| | 1353 | 2194 | 2612 | 3152 | 4097 | 5106 | 6296 | 6782 |
| 1014 | 1386 | 2232 | 2800 | 3347 | 4147 | 5207 | 6445 | 6832 |
| 1116 | 1436 | 2267 | 2928 | 3497 | 4150 | 5555 | 6614 | 6838 |
| 1249 | 1439 | 2277 | 2967 | 3531 | 4164 | 5813 | 6618 | 6865 |
| 1337 | 1501 | 2319 | 2973 | 3654 | 4165 | 5859 | 6652 | 6998 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र सह्याद्री

महाराष्ट्र राज्य लॉटरी — • राजलक्ष्मी विकली लॉटरी • — सोडत सायं. 5:15 वाजता

सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 20 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 20/05/2022

पहिले सामाईक बक्षिस रु. 10000/- — SR-04 : 5254 — चिराग एन्टरप्रायझेस, नाशिक

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1472 | 1842 | 2881 | 3961 भारत ब्रधर्स, नागपूर (5 बक्षिसे) | 4381 किशोर लॉटरी सेंटर, सांगली (5 बक्षिसे) |

| तिसरे बक्षिस रु. 1000/- | चौथे बक्षिस रु. 500/- | पाचवे बक्षिस रु. 400/- |
|---|---|---|
| 1456 | 1167 | 1323 |
| 1528 | 1239 | 2039 |
| 1979 | 1789 | 2256 |
| 2369 | 1927 | 2917 |
| 2570 | 2322 | 2928 |
| 3209 | 2509 | 3020 |
| 3307 | 2631 | 3216 |
| 3431 | 2755 | 3505 |
| 4220 | 3187 | 3704 |
| 4412 | 3790 | 3834 |
| 4459 | 3865 | 3928 |
| 4898 | 4280 | 4112 |
| 5212 | 4366 | 4469 |
| 5778 | 4869 | 4760 |
| 5960 | 5088 | 4941 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र गजलक्ष्मी

महाराष्ट्र राज्य लॉटरी — •शुक्र विकली लॉटरी• — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 20 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 20/05/2022

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 100000/- | GL-08 : 2456 | | | | |
| उत्तेजनार्थ बक्षिस रु. 2500/- | 2456 रुखमणी एन्टरप्रायझेस, औरंगाबाद (5 बक्षिसे) | | | | |
| सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES | | | | | |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 5927 | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1773 महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर (5 बक्षिसे) | 2023 महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर (5 बक्षिसे) | 2522 चिराग एन्टरप्रायझेस, नाशिक (5 बक्षिसे) | 3331 | 5693 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1039 | 2294 | 2695 | 4419 | 5192 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1486 | 1520 | 3873 | 4646 | 5307 |

पाचवे बक्षिस रु. 50/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाचवे बक्षिस रु. 50/- | 1324 | 1768 | 2229 | 2509 | 2886 | 3333 | 3779 | 4402 | 4976 | 5453 |
| | 1346 | 1891 | 2233 | 2562 | 2945 | 3341 | 3831 | 4414 | 5006 | 5455 |
| | 1357 | 1915 | 2238 | 2605 | 2949 | 3374 | 3834 | 4443 | 5021 | 5472 |
| 1005 | 1387 | 1917 | 2243 | 2628 | 2952 | 3380 | 3835 | 4448 | 5069 | 5502 |
| 1007 | 1391 | 1919 | 2247 | 2634 | 3003 | 3392 | 3863 | 4449 | 5075 | 5506 |
| 1011 | 1404 | 1938 | 2253 | 2636 | 3031 | 3396 | 3893 | 4454 | 5085 | 5535 |
| 1045 | 1473 | 1942 | 2268 | 2646 | 3036 | 3429 | 3953 | 4463 | 5087 | 5575 |
| 1057 | 1481 | 1947 | 2273 | 2662 | 3039 | 3454 | 3979 | 4476 | 5105 | 5594 |
| 1060 | 1515 | 1959 | 2278 | 2702 | 3056 | 3482 | 3985 | 4477 | 5153 | 5596 |
| 1061 | 1529 | 1991 | 2279 | 2709 | 3083 | 3484 | 4022 | 4507 | 5236 | 5616 |
| 1072 | 1534 | 2016 | 2283 | 2727 | 3121 | 3514 | 4128 | 4523 | 5257 | 5626 |
| 1081 | 1543 | 2025 | 2287 | 2746 | 3133 | 3563 | 4163 | 4590 | 5267 | 5654 |
| 1107 | 1561 | 2028 | 2299 | 2762 | 3139 | 3573 | 4190 | 4644 | 5280 | 5687 |
| 1108 | 1577 | 2067 | 2307 | 2768 | 3191 | 3596 | 4195 | 4656 | 5302 | 5759 |
| 1116 | 1594 | 2092 | 2327 | 2772 | 3196 | 3607 | 4214 | 4680 | 5303 | 5778 |
| 1121 | 1610 | 2094 | 2332 | 2778 | 3208 | 3644 | 4217 | 4704 | 5309 | 5856 |
| 1127 | 1665 | 2096 | 2350 | 2779 | 3230 | 3712 | 4224 | 4740 | 5325 | 5905 |
| 1150 | 1679 | 2109 | 2365 | 2800 | 3303 | 3723 | 4244 | 4794 | 5337 | 5925 |
| 1155 | 1682 | 2126 | 2367 | 2802 | 3306 | 3732 | 4274 | 4821 | 5338 | 5930 |
| 1180 | 1708 | 2140 | 2409 | 2823 | 3316 | 3734 | 4291 | 4889 | 5341 | 5948 |
| 1188 | 1713 | 2189 | 2425 | 2826 | 3323 | 3753 | 4305 | 4942 | 5350 | 5955 |
| 1244 | 1718 | 2223 | 2488 | 2831 | 3327 | 3754 | 4319 | 4958 | 5383 | 5959 |
| 1288 | 1719 | 2227 | 2502 | 2872 | 3332 | 3772 | 4342 | 4966 | 5437 | 5982 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र दिन भव्यतम सोडत

महाराष्ट्र राज्य लॉटरी

तिकीट किं. रु. 100/- • सोडत क्रमांक 06 • सोडत दिनांक 20/05/2022

| मालिका | MD-01 | MD-02 | MD-03 | MD-04 | MD-05 |
|---|---|---|---|---|---|
| पहिले सामाईक बक्षिस रु. 21 लाख (₹ 21 लाखाची 2 बक्षिसे) | 11567 | चिराग एन्टरप्रायझेस - नाशिक प्रिन्स एजन्सी - मुंबई यांचा मार्फत | | 38011 | — |
| दुसरे बक्षिस रु. 1 लाख | — | 17338 प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स, कल्याण | 12913 | — | 23834 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | |
|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 10000/- | 8055 |
| चौथे बक्षिस रु. 5000/- | 3005 |
| पाचवे बक्षिस रु. 2000/- | 3189 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सहावे बक्षिस रु. 1000/- | 0498 | 3557 | 5707 | 6627 | 6845 | 6960 | 8628 | 8755 | 9119 | 9696 |
| सातवे बक्षिस रु. 500/- | 0499 | 2593 | 5064 | 5506 | 7643 | 7924 | 8896 | 9380 | 9443 | 9502 |

आठवे बक्षिस रु. 200/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आठवे बक्षिस रु. 200/- | | 1093 | 1910 | 2699 | 3331 | 3973 | 4611 | 5257 | 5916 | 6652 | 7470 | 8428 | 9186 |
| | | 1111 | 1912 | 2702 | 3333 | 4039 | 4633 | 5264 | 5919 | 6657 | 7497 | 8442 | 9229 |
| | | 1163 | 2022 | 2708 | 3352 | 4044 | 4643 | 5293 | 5970 | 6660 | 7559 | 8508 | 9292 |
| 0008 | 0392 | 1197 | 2097 | 2732 | 3380 | 4063 | 4644 | 5295 | 6051 | 6702 | 7576 | 8518 | 9298 |
| 0010 | 0406 | 1199 | 2192 | 2751 | 3386 | 4091 | 4675 | 5376 | 6056 | 6829 | 7577 | 8523 | 9305 |
| 0023 | 0408 | 1205 | 2201 | 2804 | 3393 | 4112 | 4691 | 5385 | 6062 | 6836 | 7605 | 8589 | 9360 |
| 0031 | 0410 | 1219 | 2202 | 2807 | 3404 | 4148 | 4713 | 5426 | 6077 | 6860 | 7649 | 8640 | 9382 |
| 0036 | 0428 | 1231 | 2212 | 2821 | 3430 | 4241 | 4744 | 5450 | 6085 | 6861 | 7679 | 8680 | 9414 |
| 0050 | 0480 | 1328 | 2228 | 2822 | 3431 | 4244 | 4749 | 5458 | 6098 | 6863 | 7687 | 8712 | 9507 |
| 0051 | 0545 | 1344 | 2232 | 2826 | 3447 | 4245 | 4752 | 5483 | 6116 | 6870 | 7716 | 8723 | 9612 |
| 0052 | 0554 | 1470 | 2253 | 2862 | 3458 | 4309 | 4821 | 5502 | 6198 | 6920 | 7727 | 8738 | 9651 |
| 0064 | 0555 | 1489 | 2265 | 2933 | 3482 | 4343 | 4869 | 5506 | 6206 | 7000 | 7749 | 8740 | 9656 |
| 0067 | 0577 | 1505 | 2276 | 2942 | 3531 | 4367 | 4879 | 5515 | 6236 | 7038 | 7771 | 8785 | 9713 |
| 0080 | 0602 | 1519 | 2285 | 2997 | 3569 | 4382 | 4900 | 5547 | 6291 | 7053 | 7776 | 8791 | 9758 |
| 0103 | 0607 | 1521 | 2328 | 3000 | 3664 | 4383 | 4920 | 5548 | 6319 | 7071 | 7792 | 8801 | 9759 |
| 0105 | 0612 | 1535 | 2335 | 3017 | 3703 | 4399 | 4945 | 5582 | 6325 | 7087 | 7808 | 8851 | 9849 |
| 0106 | 0649 | 1595 | 2343 | 3023 | 3716 | 4404 | 4960 | 5598 | 6329 | 7097 | 7818 | 8853 | 9862 |
| 0126 | 0702 | 1608 | 2355 | 3033 | 3723 | 4405 | 4983 | 5677 | 6338 | 7118 | 7853 | 8858 | 9892 |
| 0127 | 0707 | 1611 | 2412 | 3051 | 3752 | 4407 | 5059 | 5721 | 6362 | 7179 | 7915 | 8859 | 9909 |
| 0140 | 0800 | 1668 | 2448 | 3063 | 3843 | 4411 | 5097 | 5730 | 6365 | 7185 | 7917 | 8872 | 9915 |
| 0213 | 0802 | 1670 | 2462 | 3086 | 3854 | 4419 | 5124 | 5733 | 6376 | 7214 | 7971 | 8877 | 9936 |
| 0240 | 0830 | 1691 | 2496 | 3205 | 3857 | 4435 | 5151 | 5747 | 6386 | 7216 | 7987 | 8905 | 9946 |
| 0256 | 0900 | 1792 | 2521 | 3229 | 3860 | 4468 | 5172 | 5754 | 6413 | 7228 | 8092 | 8931 | 9949 |
| 0285 | 0901 | 1813 | 2576 | 3267 | 3864 | 4474 | 5173 | 5758 | 6563 | 7278 | 8146 | 8948 | 9969 |
| 0296 | 0910 | 1819 | 2625 | 3291 | 3868 | 4485 | 5175 | 5776 | 6564 | 7297 | 8185 | 8980 | 9970 |
| 0324 | 0914 | 1852 | 2641 | 3314 | 3894 | 4489 | 5192 | 5800 | 6576 | 7399 | 8238 | 8984 | 9982 |
| 0350 | 0991 | 1881 | 2656 | 3317 | 3913 | 4492 | 5197 | 5839 | 6617 | 7419 | 8284 | 8987 | 9986 |
| 0361 | 1030 | 1892 | 2663 | 3319 | 3921 | 4574 | 5226 | 5881 | 6627 | 7437 | 8338 | 9090 | 9991 |
| 0379 | 1031 | 1902 | 2686 | 3329 | 3936 | 4579 | 5249 | 5895 | 6649 | 7457 | 8385 | 9116 | 9998 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## सुविचार


विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी.
मोबा.९४२२४२०६११

सुंदर आयुष्य सहज घडत नसते.
ते जाणीवपूर्वक घडवावे लागते.

## पंचांग

शनिवार २१ मे, २०२२
शक १९४४ शुभकृत्नामसंवत्सर

वैशाख कृष्ण षष्ठी * नक्षत्र : श्रवण



रवी उदय- ०६-०४
रवी अस्त- १९-०७

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० मकर

धनिष्ठा नवकारंभ रात्री ११.४६, मिथुनायन सकाळी ६.५३,
दहशतवाद विरोधी दिन

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे**

संपर्क - जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
वितरण विभाग : ९५९४९३६४४१ छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५.
ई-मेल navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande**

## पाककृती

### भोपळ्याचे घारगे

★ साहित्य :- २ ते ३ वाटी भोपळ्याचा किस. गव्हाचे पीठ १ वाटी गूळ किंवा थोडे त्यापेक्षा जास्त. १ चमचा वेलची पावडर. खसखस, तेल



★ कृती :- घारगे बनवताना सर्वप्रथम भोपळा कट करून त्याच्या छोट्या छोट्या फोडी कट करा तसेच त्यामधील बिया काढून घ्या आणि मग त्या फोडी किसणीवर किसून घ्या. मग आता हा ३ वाटी किस एका भांड्यामध्ये काढा आणि त्यामध्ये एक वाटी किंवा त्यापेक्षा थोडा जास्त किसलेला गूळ घाला आणि ते मिश्रण एकत्र करून गॅसवर मध्यम आचेवर शिजले कि गॅस बंद करा आणि हे मिश्रण गार होऊ द्या. मग हे मिश्रण गार झाले की त्यामध्ये जितके मावेल तेवढे गव्हाचे पीठ घाला आणि ते चांगले मळून घ्या. यामध्ये जितके मावेल तेवढेच पीठ घाला जास्त घातले तर घारगे चांगले लागत नाहीत). आणि हे मळलेले पीठ कमी कमी अर्धा तास भिजू द्या किंवा जास्तीत जास्त १ तास भिजवा. मग हे पीठ चांगले भिजले की त्याचे छोटे छोटे गोळे बनवा. आता मध्यम आचेवर एक कढई ठेवा आणि त्यामध्ये घारगे तळण्यासाठी तेल घाला आणि ते गरम होऊ द्या.

आता आपण बनवलेले गोळ्यांमधील एक गोळा घ्या आणि पोळपाटावर एक प्लास्टिक पेपर ठेवा आणि हाताला अगदी थोडेसे पाणी लावून तो थोडा जाडसर थापून घ्या. आपण पुन्हा जितक्या आकाराच्या बनवता तितक्या आकाराचे घारगे बनवून घ्यावे). आणि त्या घारग्या वरील भागावर थोडीशी खसखस घालावी आणि मग ते हळूवारपणे गरम तेलामध्ये सोडावे आणि लालसर रंग येईपर्यंत तळून घ्यावे. अशा प्रकारे सर्व घारगे बनवून घ्यावे. घारगे आपण कोणत्याही वेळेला तसेच खावू शकतो किंवा मग चहा सोबत देखील घारगे खूप छान लागतात.

## जाहीर सूचना

खोली/संरचना क्र. ३४६, झोपडपट्टी क्र. १, गल्ली क्र. १, एस. जी. बर्वे मार्ग, बसंत नगर, सीएसटी रोड, ठक्कर बाप्पा कॉलनी, चेंबूर, मुंबई ४०० ०७१, नवीन फोटोपास सर्व्हे पावती क्र. ०६६१०६४ च्या मालक **श्रीमती इंद्रा पारसमल तुंगारिया उर्फ श्रीमती नारंगी पारसमल तुंगारिया** या माझ्या अशिलाच्या सूचनेअंतर्गत याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे. माझ्या अशिलांनी असे नमूद केले आहे की, सदर खोलीच्या संदर्भातील त्यांची मूळ खरेदी कागदपत्रे, जसे की, प्रतिज्ञापत्र, मुखत्यार पत्र, श्री. रमेश कुमार सावळराम गोस्वामी यांच्याकडून खरेदी केल्याचे दि. २०.०३.१९९५ रोजीचे विक्री करारपत्र हरविले/गहाळ झाले/सापडत नाही.

उपरोल्लेखित हरविलेल्या/गहाळ झालेल्या/सापडत नसलेल्या कागदपत्रामध्ये किंवा सदर खोलीवर कोणताही दावा/वे असणाऱ्या सर्व व्यक्ती/प्राधिकाऱ्यांनी त्याबाबत जाहीर सूचनेच्या या प्रसिद्धीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत माझ्या निम्न उल्लेखित कार्यालयात कागदोपत्री पुराव्यांसह लेखी स्वरुपात मला कळवावे. असे न केल्यास, त्यावर कोणताही दावा नाही असे मानण्यात येईल. येथील १५ दिवसांच्या कालावधीनंतर प्राप्त झालेले कोणतेही दावे, जर असल्यास, सोडून दिले आहेत असे मानण्यात येईल.

सही/-
**अभिषेक के. पारेख**
वकील, उच्च न्यायालय
दुकान क्र. १५ आणि १६, जनता मार्केट,
चेंबूर रेल्वे स्टेशनजवळ, चेंबूर, मुंबई -४०० ०७१.

## जाहीर नोटिस

के - ७/०१०, स्वप्नपूर्ती को-ऑ.हौ.सो. (लि). सुर्या कॉम्प्लेक्स, एम एम आर डि ए कॉलनी, स्टेशन रोड, कांजुरमार्ग (प) मुंबई. ४०००७८ आमच्या सोसायटीचे सभासद **श्रीमती दगडाबाई कडू जाधव** यांचे २८-०७-२०१४ रोजी निधन झाले असून त्यांनी वारस फॉर्म भरला नसल्यामुळे त्यांचा वारस तपास करण्यात येत आहे, तरी त्यांचे जे वारस असतील त्यांनी योग्य त्या पुराव्यासहित १५ दिवसांच्या आत सोसायटीच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सायंकाळी ८.३० ते १०.०० या वेळेत संपर्क साधावा.

**आपले विश्वासू**
**स्वप्नपूर्ती को-ऑ. हौ. सो.(लि).**

## TENDER NOTICE

Sealed Bids are invited from reputed Builders / Developers having strong Technical & Financial capabilities for Redevelopment of
**CHANDRESH TERRACE CO-OP. HSG. SOC. LTD., Parshwa Nagar, Mira Bhayander Road, Mira Road (E), Dist. Thane – 401107.**
**Mob. 8286346531/ 9833485422**
Hon. Chairman – Mrs. Nanda P. Jagdale. Hon. Secretary –Mr. Anant B. Havannavar.
Plot Aarea : 1700.00 Sq Mtrs.. No. of Flats : 56 & No of Shops :3. Survey No. 363/12
Tender Documents are available at Society Office **From 22/05/2022 to 10/06/2022** between **06 p.m. & 08 p.m.**
Tender cost **Rs. 5000/-** (Non-refundable), Cash/DD – in favour of the Society.
Last date for submission of **Tender : 10/06/2022** – upto **08.00 p.m.** at Society Office.
Meeting will be held on **12/06/2022 between 11.00 a.m. & 1.00 p.m.**
The Society reserves it's rights to reject any or all offers received without providing any reason.
For and on behalf of
**CHANDRESH TERRACE CO-OP. HSG. SOC. LTD.**
**Sd/-**
**(Hon. Secretary/Hon. Chairman)**

**THE MUNICIPAL CO-OPERATIVE BANK LTD., MUMBAI**
MUNICIPAL BANK BHAVAN, 245,
P. D' MELLO ROAD, FORT, MUMBAI –400 001
TEL: +91-22-22613814 /+91-22-22717800/32/33
EMAIL: accounts@mcbmumbai.com

## TENDER NOTICE

The Municipal Co-Op. Bank Ltd., Mumbai invites sealed Tenders from reputed agencies for hiring the services of two fully outsourced Dedicated cash vans for Bank including one cash executive, two valid licence holder armed guards, one driver and one loader for each cash van. Tender documents shall be downloaded from the bank's website: www.municipalbankmumbai.com from 21/05/2022 to 31/05/2022. Last date and time for submission of Tender : On or Before 31/05/2022 up to 3.00 PM

PLACE: MUMBAI Sd/-
DATE: 20/05/2022 GENERAL MANAGER

## जाहीर सूचना

**चंद्रेश टेरेस को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., पत्ता - पार्श्व नगर, मीरा भाईंदर रोड, साई पेट्रोल पंपजवळ, मीरा रोड (पू), ठाणे ४०११०७** चे सदस्य, आणि संस्थेच्या इमारतीमधील सदनिका क्र. ए-२०३चे धारक **श्री. अशोक धनाजी महाजन** यांचे दि. ०८.२.२०२२ रोजी निधन झाले.

संस्था याद्वारे दिवंगत सदस्याचे संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील सदर भाग आणि हितसंबंधाच्या हस्तांतरणास वारस किंवा वारसांकडून किंवा इतर दावेदारांकडून आक्षेपदार किंवा आक्षेपदारांकडून सदर सूचना प्रसिद्धीपासून **१५ दिवसांच्या** कालावधीमध्ये दावे आणि आक्षेप, दिवंगत सदस्याच्या संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील सदर भाग आणि हितसंबंधाच्या हस्तांतरणास त्याच्या तिच्या/त्यांच्या दाव्याच्या/आक्षेपाच्या समर्थनार्थ अशी कागदपत्रे आणि इतर पुराव्यांच्या प्रतींसह, मागवित आहे. वरील विहीत कालावधीमध्ये जर कोणतेही दावे/आक्षेप प्राप्त न झाल्यास, संस्था दिवंगत सदस्याचे संस्थेच्या भांडवल मालमत्तेमधील सदर भाग आणि हितसंबंधाबाबत संस्थेच्या उप-विधीमध्ये देण्यात आलेल्या पद्धतीने व्यवहार करण्यास मुक्त असेल. दिवंगत सदस्याचे संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील सदर भाग आणि हितसंबंधाच्या हस्तांतरणाबाबत जर कोणतेही दावे/आक्षेप संस्थेस प्राप्त झाल्यास संस्थेच्या उप-विधीमध्ये देण्यात आलेल्या पद्धतीने त्यावर निर्णय घेतला जाईल. संस्थेच्या नोंदणीकृत उप विधीची प्रत दावेदार/आक्षेपदार यांच्याद्वारे पाहणीकरिता सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तिच्या कालावधीच्या समाप्तीपर्यंत **सायं. ६ ते ८** या वेळेत संस्थेच्या कार्यालयात/संस्थेच्या सचिवांकडे उपलब्ध असेल.

**चंद्रेश टेरेस को-ऑप. हौ. सोसा. लि.**
करिता आणि त्यांच्या वतीने
**सही/-**
मान. सचिव
ठिकाण: मीरा रोड दिनांक: २१.०५.२०२२

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

क्र. झोपुप्रा/अभि/ओडी/२०२२/१९६१८
दिनांक: १९ मे २०२२

## जाहीर सुचना

सदर जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार ए.के. इंटरप्रायझेसचे भागीदार अजय ज्ञानदेव कदम यांनी अंबालिका सहकारी गृहनिर्माण संस्था (नियो.) या संस्थेकरीता न.भु.क्र. ३३७, ३३७/१ ते ३०, ३३८, ३३८/१ ते ६, ३३९, ३३९/१ व २, ३४०, ३४०/१ ते १३, ३४१, ३४१/१ ते १२, ३४२, ३४२/१ ते १२, ३४३, ३४३/१ते ११, मौजे-कन्हेरी, तालुका-बोरीवली या मिळकतीवरील क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ क (१) अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेबाबत विनंती अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार यांनी अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांचे आधारात मिळकतीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**मौजे-कन्हेरी, तालुका-बोरीवली**

| अ. क्र. | न.भू.क्र. | मिळकत पत्रिकेनुसार क्षेत्र (चौ.मी.) | धारणाधिकार | धारक | पट्टेदार | इमला मालक |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | ३३७ | ३.५० | | १) श्री. गिरीश मेहता<br>२) श्री. अजय ज्ञानदेव कदम<br>३) श्री. संजय बळीराम कदम<br>४) श्री. चंद्रमोहन नेमीचंद भंडारी | श्री. द्वारकादास जाधवजी | |
| २ | ३३७/१ | ३०.९० | | H<br>पोटभुई भाडेकरू - पहलाज कोटसिंग मदनानी<br>१) श्री. गिरीश मेहता<br>२) श्री. अजय ज्ञानदेव कदम<br>३) श्री. संजय बळीराम कदम<br>४) श्री. चंद्रमोहन नेमीचंद भंडारी | --- | |
| ३ | ३३७/२ | १३.७० | | | | |
| ४ | ३३७/३ | १३.७० | | | | |
| ५ | ३३७/४ | १३.१० | | | | |
| ६ | ३३७/५ | ५७.६० | | | | |
| ७ | ३३७/६ | ३०.६० | | | | |
| ८ | ३३७/७ | १६.५० | | | | |
| ९ | ३३७/८ | ३०.९० | | १) श्री. गिरीश मेहता<br>२) श्री. अजय ज्ञानदेव कदम<br>३) श्री. संजय बळीराम कदम<br>४) श्री. चंद्रमोहन नेमीचंद भंडारी | | रामब्रिक्ष कालिकाप्रसाद शुक्ला<br>रामसुरत अक्षयवार शुक्ला<br>सुभाष अक्षयवार शुक्ला |
| १० | ३३७/९ | ३१.०० | | | श्री. द्वारकादास जाधवजी | --- |
| ११ | ३३७/१० | ५३.४० | | | | |
| १२ | ३३७/११ | ११.४० | | १) श्री. गिरीश मेहता<br>२) श्री. अजय ज्ञानदेव कदम<br>३) श्री. संजय बळीराम कदम<br>४) श्री. चंद्रमोहन नेमीचंद भंडारी | -- | रामब्रिक्ष कालिकाप्रसाद शुक्ला<br>रामसुरत अक्षयवार शुक्ला<br>सुभाष अक्षयवार शुक्ला |
| १३ | ३३७/१२ | १०.९० | | | | |
| १४ | ३३७/१३ | ११.४० | | | | |
| १५ | ३३७/१४ | १३.१० | | | | |
| १६ | ३३७/१५ | १२.६० | | | | |
| १७ | ३३७/१६ | १३.१० | | | | |
| १८ | ३३७/१७ | ४७.१० | | | | विसुनाथ मथुरा चौहान |
| १९ | ३३७/१८ | १५.७० | | | | |
| २० | ३३७/१९ | १६.३० | | | | |
| २१ | ३३७/२० | ३५.२० | | | | |
| २२ | ३३७/२१ | १३.५० | | | | |
| २३ | ३३७/२२ | २३.४० | | | | |
| २४ | ३३७/२३ | ११.९० | | | | |
| २५ | ३३७/२४ | ७.२० | | | | |
| २६ | ३३७/२५ | ३३५.७० | | | | |
| २७ | ३३७/२६ | १६.९० | | १) श्री. गिरीश मेहता<br>२) श्री. अजय ज्ञानदेव कदम<br>३) श्री. संजय बळीराम कदम<br>४) श्री. चंद्रमोहन नेमीचंद भंडारी | श्री. द्वारकादास जाधवजी | अयोध्यानाथ रामदत्त शुक्ला |
| २८ | ३३७/२७ | ११.९० | | | --- | |
| २९ | ३३७/२८ | १०.७० | | | | रामब्रिक्ष कालिकाप्रसाद शुक्ला<br>रामसुरत अक्षयवार शुक्ला<br>सुभाष अक्षयवार शुक्ला |
| ३० | ३३७/२९ | ९.५० | | | | |
| ३१ | ३३७/३० | २८.१० | | | | ---- |
| ३२ | ३३८ | ९९.०० | | श्रीमती शोभा आंताराम कदम<br>श्रीमती शांताबेन चंद्रमोहन भंडारी<br>श्री. जसवंतराज चंद्रमोहन भंडारी<br>श्री.सुशील चंद्रमोहन भंडारी<br>श्रीमती सुमन अनिल लोढा<br>श्रीमती मीना जसवंतराज भंडारी<br>श्री.चेतन जसवंतराज भंडारी<br>श्रीमती जिनल अनुज मेहता | श्री द्वारकादास जाधवजी रुपारेलीया | |
| ३३ | ३३८/१ | ३०.३० | क | श्रीमती शोभा आंताराम कदम<br>श्री. गिरीश मेहता<br>श्री. अजय ज्ञानदेव कदम<br>श्री. संजय बळीराम कदम<br>श्री. चंद्रमोहन नेमीचंद भंडारी<br>श्रीमती शांताबेन चंद्रमोहन भंडारी<br>श्री.सुशील चंद्रमोहन भंडारी<br>श्रीमती सुमन अनिल लोढा<br>श्रीमती मीना जसवंतराज भंडारी<br>श्री.चेतन जसवंतराज भंडारी<br>श्रीमती जिनल अनुज मेहता | | --- |
| ३४ | ३३८/२ | ३६.०० | | श्रीमती शोभा आंताराम कदम<br>श्री. गिरीश मेहता<br>श्री. अजय ज्ञानदेव कदम<br>श्री. संजय बळीराम कदम<br>श्री. चंद्रमोहन नेमीचंद भंडारी<br>श्रीमती शांताबेन चंद्रमोहन भंडारी<br>श्री. जसवंतराज चंद्रमोहन भंडारी<br>श्री.सुशील चंद्रमोहन भंडारी<br>श्रीमती सुमन अनिल लोढा<br>श्रीमती मीना जसवंतराज भंडारी<br>श्री.चेतन जसवंतराज भंडारी<br>श्रीमती जिनल अनुज मेहता | | |
| ३५ | ३३८/३ | १२.८० | | | | |
| ३६ | ३३८/४ | १०.३० | | | | |
| ३७ | ३३८/५ | १२.५० | | | | |
| ३८ | ३३८/६ | १५.०० | | श्रीमती शोभा आंताराम कदम<br>श्री. गिरीश मेहता<br>श्री. अजय ज्ञानदेव कदम<br>श्री. संजय बळीराम कदम<br>श्री. चंद्रमोहन नेमीचंद भंडारी<br>श्रीमती शांताबेन चंद्रमोहन भंडारी<br>श्री.सुशील चंद्रमोहन भंडारी<br>श्रीमती सुमन अनिल लोढा<br>श्रीमती मीना जसवंतराज भंडारी<br>श्री.चेतन जसवंतराज भंडारी<br>श्रीमती जिनल अनुज मेहता | श्री द्वारकादास जाधवजी रुपारेलीया | |
| ३९ | ३३९ | १२३.७० | | श्री. गिरीश मेहता<br>श्री. अजय ज्ञानदेव कदम<br>श्री. संजय बळीराम कदम<br>श्री. चंद्रमोहन नेमीचंद भंडारी<br>श्रीमती शांताबेन चंद्रमोहन भंडारी<br>श्री.सुशील चंद्रमोहन भंडारी<br>श्रीमती सुमन अनिल लोढा<br>श्रीमती मीना जसवंतराज भंडारी<br>श्री.चेतन जसवंतराज भंडारी<br>श्रीमती जिनल अनुज मेहता | श्री द्वारकादास जाधवजी रुपारेलीया<br>पोटभाडेकरू- सविताबेन उमाशंकर पंड्या | |
| ४० | ३३९/१ | ३३.४० | | | | |
| ४१ | ३३९/२ | ६३.४० | | | | |
| ४२ | ३४० | १४१.१० | | श्री. गिरीश मेहता<br>श्री. अजय ज्ञानदेव कदम<br>श्री. संजय बळीराम कदम<br>श्री. चंद्रमोहन नेमीचंद भंडारी | श्री द्वारकादास जाधवजी रुपारेलीया | |
| ४३ | ३४०/१ | ७.९० | | | श्री द्वारकादास जाधवजी रुपारेलीया<br>पोटभाडेकरू- सुरेश तपेश्वर तिवारी | |
| ४४ | ३४०/२ | ७.९० | | | | |
| ४५ | ३४०/३ | ८.५० | | | | |
| ४६ | ३४०/४ | ७.१० | | | | |
| ४७ | ३४०/५ | ९.१० | | | | |
| ४८ | ३४०/६ | २८.७० | | | | |
| ४९ | ३४०/७ | १९.२० | | | -- | |
| ५० | ३४०/८ | १९.२० | | | श्री द्वारकादास जाधवजी रुपारेलीया<br>पोटभाडेकरू- सुरेश तपेश्वर तिवारी | |
| ५१ | ३४०/९ | १८.६० | | | | |
| ५२ | ३४०/१० | १९.२० | | | | |
| ५३ | ३४०/११ | १७.५० | | | | |
| ५४ | ३४०/१२ | १९.२० | | | | |
| ५५ | ३४०/१३ | १७.५० | | | | |
| ५६ | ३४१ | १४१.८० | | श्री विद्यार्थी बलिस्टरसिंग ठाकुर | श्री विद्यार्थी बलिस्टरसिंग ठाकुर | |
| ५७ | ३४१/१ | ११.०० | | | | |
| ५८ | ३४१/२ | १०.३० | | | | |
| ५९ | ३४१/३ | ३०.९० | | श्री.बचुबाई वॉरोन्झोव्ह डाशूकोव्ह<br>श्री. गिरीश मेहता | --- | |
| ६० | ३४१/४ | ३३.०० | | --- | श्री विद्यार्थी बलिस्टरसिंग ठाकुर | |
| ६१ | ३४१/५ | २६.०० | | श्री विद्यार्थी बलिस्टरसिंग ठाकुर | --- | |
| ६२ | ३४१/६ | १२.५० | | | | |
| ६३ | ३४१/७ | ८.४० | | | | |
| ६४ | ३४१/८ | १४.०० | | | | |
| ६५ | ३४१/९ | २०.२० | | | | |
| ६६ | ३४१/१० | १६.९० | | | श्री विद्यार्थी बलिस्टरसिंग ठाकुर | |
| ६७ | ३४१/११ | १२.२० | | | | |
| ६८ | ३४१/१२ | ९.१० | | | | |
| ६९ | ३४२ | ९०.४० | | श्री. गिरीश मेहता<br>श्री. अजय ज्ञानदेव कदम<br>श्री. संजय बळीराम कदम<br>श्री. चंद्रमोहन नेमीचंद भंडारी | श्री द्वारकादास जाधवजी रुपारेलीया<br>पोटभाडेकरू- चुनीलाल छगनलाल शाह | |
| ७० | ३४२/१ | ८.५० | | | | |
| ७१ | ३४२/२ | १४.६० | | | | |
| ७२ | ३४२/३ | ९.५० | | | | |
| ७३ | ३४२/४ | ११.२० | | | | |
| ७४ | ३४२/५ | १२.४० | | | | |
| ७५ | ३४२/६ | ९.४० | | | | --- |
| ७६ | ३४२/७ | १३.५० | | | | |
| ७७ | ३४२/८ | १३.०० | | | | |
| ७८ | ३४२/९ | १२.९० | | | | |
| ७९ | ३४२/१० | ६.१० | क | --- | श्री. द्वारकादास जाधवजी रुपारेलीया<br>पोटभाडेकरू- चुनीलाल छगनलाल शाह | |
| ८० | ३४२/११ | ६.१० | | श्री. गिरीश मेहता<br>श्री. अजय ज्ञानदेव कदम<br>श्री. संजय बळीराम कदम<br>श्री. चंद्रमोहन नेमीचंद भंडारी | --- | |
| ८१ | ३४२/१२ | ४.५० | | | | |
| ८२ | ३४३ | ८०.८० | | | | |
| ८३ | ३४३/१ | ४.०० | | श्रीमती मणीबेन लखमसी शहा<br>श्री. गिरीश मेहता<br>श्री. अजय ज्ञानदेव कदम<br>श्री. संजय बळीराम कदम<br>श्री. चंद्रमोहन नेमीचंद भंडारी | श्री. द्वारकादास जाधवजी रुपारेलीया | |
| ८४ | ३४३/२ | २२.५० | | श्री. गिरीश मेहता<br>श्री. अजय ज्ञानदेव कदम<br>श्री. संजय बळीराम कदम<br>श्री. चंद्रमोहन नेमीचंद भंडारी | | |
| ८५ | ३४३/३ | ३१.५० | | | श्री. द्वारकादास जाधवजी रुपारेलीया<br>पोटभाडेकरू- शाह लखमजी हिरजी | |
| ८६ | ३४३/४ | ३२.९० | | श्रीमती मणीबेन लखमसी शहा<br>श्री. गिरीश मेहता<br>श्री. अजय ज्ञानदेव कदम<br>श्री. संजय बळीराम कदम<br>श्री. चंद्रमोहन नेमीचंद भंडारी | | |
| ८७ | ३४३/५ | १९.५० | | श्री. गिरीश मेहता<br>श्री. अजय ज्ञानदेव कदम<br>श्री. संजय बळीराम कदम<br>श्री. चंद्रमोहन नेमीचंद भंडारी | श्री. द्वारकादास जाधवजी रुपारेलीया<br>पोटभाडेकरू- शाह लखमजी हिरजी<br>श्रीमती मणीबेन लखमसी शहा | |
| ८८ | ३४३/६ | २५.१० | | श्री. गिरीश मेहता<br>श्री. अजय ज्ञानदेव कदम<br>श्री. संजय बळीराम कदम | | |
| ८९ | ३४३/७ | १८.७० | | | | |
| ९० | ३४३/८ | ७.५० | | नॅशनल अँड प्रिन्डलेज बँक लि. विश्वस्त<br>श्री. गिरीश मेहता<br>श्री. अजय ज्ञानदेव कदम<br>श्री. संजय बळीराम कदम<br>श्री. चंद्रमोहन नेमीचंद भंडारी | श्री. द्वारकादास जाधवजी रुपारेलीया<br>श्रीमती मणीबेन लखमसी शहा | श्री. गोपीलाल उदयलाल संघवी |
| ९१ | ३४३/९ | ३.४० | | श्री. गिरीश मेहता<br>श्री. अजय ज्ञानदेव कदम<br>श्री. संजय बळीराम कदम<br>श्री. चंद्रमोहन नेमीचंद भंडारी | | |
| ९२ | ३४३/१० | ४.५० | | | श्री. द्वारकादास जाधवजी रुपारेलीया<br>पोटभाडेकरू- शाह लखमजी हिरजी<br>श्रीमती मणीबेन लखमसी शहा | |
| ९३ | ३४३/११ | ४.५० | | | | |
| एकुण | | **२५४१.००** | | | | |

उपरोक्त नमुद मिळकतीपैकी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करावयाच्या मिळकतींचे क्षेत्र व चतुःर्सिमांचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | गावाचे नाव | न.भू.क्र. | मिळकत पत्रिकेनुसार क्षेत्र (चौ.मी.) | घोषित करावयाचे क्षेत्र (चौ.मी.) | एकत्रित चतुःर्सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | पूर्वेस | पश्चिमेस | दक्षिणेस | उत्तरेस |
| १ | मौजे-कन्हेरी, तालुका-बोरीवली | ३३७ | ३.५० | ३.५० | रस्ता | रस्ता | न.भू.क्र. ३३३, ३३४. ३३६ | रस्ता |
| २ | | ३३७/१ ते ३० | ९४७.१० | ९४७.१० | | | | |
| ३ | | ३३८ | ९९.०० | ९९.०० | | | | |
| ४ | | ३३८/१ ते ६ | ११६.९० | ११६.९० | | | | |
| ५ | | ३३९ | १२३.७० | १२३.७० | | | | |
| ६ | | ३३९/१ ते २ | ९६.८० | ९६.८० | | | | |
| ७ | | ३४० | १४१.१० | १४१.१० | | | | |
| ८ | | ३४०/१ ते १३ | १९९.६० | १९९.६० | | | | |
| ९ | | ३४१ | १४१.८० | १४१.८० | | | | |
| १० | | ३४१/१ ते १२ | २०४.५० | २०४.५० | | | | |
| ११ | | ३४२ | ९०.४० | ९०.४० | | | | |
| १२ | | ३४२/१ ते १२ | १२१.७० | १२१.७० | | | | |
| १३ | | ३४३ | ८०.८० | ८०.८० | | | | |
| १४ | | ३४३/१ ते ११ | १७४.१० | १७४.१० | | | | |
| **एकूण** | | | **२५४१.००** | **२५४१.००** | | | | |

उपरोक्त नमुद मिळकत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेबाबत जमीन मालक अथवा कोणीही हितसंबंधितांच्या हरकती / आक्षेप असल्यास, त्यांनी आपली हरकत / आक्षेप सदर जाहीर सुचना प्रसिध्द झालेल्या दिनांकापासुन ३० दिवसांच्या आत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे लेखी दाखल करणेबाबत कळविण्यात येत आहे.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता - आर/मध्य**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**

नविन प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई -४०००५१, फॅक्स ९१-२२-२६५९०४५७, दुरध्वनी ०२२-२६५९०५११/०४०५/१८७९/०९९३ संकेतस्थळ- www.sra.gov.in Email: info@sra.gov.in

नवाकाळ

web:http://navakal.in | e-mail: navakal.1923@gmail.com

# चंदेरी च्वींगम

# माझ्या भूमिकेमुळे नाट्यमय कलाटणी



झी टीव्हीवर सध्या 'काशीबाई बाजीराव बल्लाळ' ही ऐतिहासिक मालिका गाजतेय. अलीकडेच या मालिकेच्या कथानकाचा काळ सात वर्षांनी पुढे नेण्यात आला आहे. आता काशीबाई आणि बाजीराव हे मनाने एकमेकांच्या जवळ येऊ लागलेले असतानाच मस्तानीचा प्रवेश होतोय. अभिनेत्री **फरनाझ शेट्टी** मस्तानी साकारतेय. याच पार्श्वभूमीवर तिच्याशी केलेली बातचीत...

**फरनाझ, तुझ्या भूमिकेचे वैशिष्ट्य सांग...**

- मस्तानीची माझी भूमिका काशी आणि बाजीराव यांच्यात तेढ निर्माण करणारी ठरेल. बुंदेलखंडची राजकन्या असलेल्या या सौंदर्यवती मस्तानीच्या अंगच्या लढाऊ वृत्तीनेही प्रेक्षक चकित होतील. मस्तानीने सर्वांवरच आपली मोहिनी घातली असली, तरी तिची नजर मात्र बाजीराववर स्थिर झालेली असते. त्याला भेटण्यापूर्वीच त्याची कीर्ती ऐकून ती भारावून गेलेली असते आणि म्हणूनच आपल्या राज्यावर आलेल्या संकट प्रसंगातून बाजीराव आपली सुटका करील, अशी तिला खात्री वाटत असते.

**मस्तानीने मानसिक तयारी केली असेल ना?**

- हो. नक्कीच... बाजीराव मस्तानीबरोबर एक अधिकृत नाते निर्माण करू शकत नसला तरी त्याच्या घरच्यांकडून कितीही अपमान सहन करण्याची मानसिक तयारी मस्तानीने केलेली असते. कारण कसेही करून तिला बाजीरावची साथ सोडायची नसते. तिच्या प्रवेशानंतर या मालिकेत काशीबाई आणि बाजीरावाच्या जीवनातील नवा संघर्षमय अध्याय सुरू होईल.

**ही भूमिका तू का स्वीकारलीस?**

- मस्तानीची व्यक्तिरेखा साकारण्यास मी खूपच उत्सुक आहे, कारण तिच्या व्यक्तिमत्त्वाला असलेल्या विविध पैलूंमळे मला माज्या अभिनयाचं वैविध्य सादर करण्याची संधी मिळणार आहे. ती लढवय्यी राजकन्या असून ती इस्लामप्रमाणेच हिंदू उपासनेचाही स्वीकार करते. तसंच ती बाजीरावाची प्रेयसीही आहे. मस्तानीसारखी व्यक्तिरेखा मी यापूर्वी कधीच साकारलेली नाही.

**या भूमिकेसाठी तू काय तयारी केलीस?**

- तयारी तर प्रत्येक भूमिकेसाठी मी करतेच. मस्तानी साकारायची संधी मिळाली तेव्हा मी मस्तानीच्या मानसिकतेतून विचार करू लागले. आमचे दिग्दर्शकही मला यासाठी भरपूर मदत करत आहेत. म्हणूनच 'काशीबाई बाजीराव बल्लाळ' या मालिकेत प्रेक्षकांना मस्तानीच्या व्यक्तिमत्त्वाचे आजवर अज्ञात असलेले हे विविध पैलू पाहायला मिळतील हे मी सांगू शकते.

**प्रेक्षकांना आता काय पाहायला मिळेल?**

- काशी आणि बाजीराव यांच्या जीवनातील तिचा नाट्यमय प्रवेश मालिकेच्या कथानकाला पूर्ण कलाटणी देणारं ठरणार आहे. त्यामुळे प्रेक्षकांनाही ही मालिका म्हणजे पर्वणी ठरणार असून ते आमच्या मालिकेवर प्रेमाचा वर्षाव करतील, अशी मी आशा करते. या मालिकेच्या आगामी भागांमध्ये मस्तानीच्या प्रवेशामुळे उलथापालथ होणार असून तिच्या प्रवेशाचा बाजीराव आणि काशीबाई यांच्या नात्यावर कोणता परिणाम घडेल, ते पाहणे खूपच रंजक ठरेल.

## प्रवाह पिक्चरसाठी तीन दिग्गज एकत्र



मराठी चित्रपटांसाठी अनेक वेगवेगळी चॅनल्स असतानाच 'प्रवाह पिक्चर' ही नवीन वाहिनी आता रूजू झाली आहे. डिस्ने स्टारच्या या चॅनेलवर जुन्यासोबतच नवीन मराठी सिनेमेही दाखवले जाणार आहेत. या चॅनेलच्या अनावरणासाठी आयोजित कार्यक्रमात मराठी चित्रपटसृष्टीतील बहुतांश सेलिब्रेटी हजर होते. यातच मराठीतील तीन दिग्गज अभिनेत्यांनीही हजेरी लावली. यात महेश कोठारे, अशोक सराफ आणि सचिन पिळगावकर या तीन दिग्गज मराठी अभिनेत्यांचाही समावेश होता. विशेष म्हणजे या वाहिनीवर दर रविवारी नव्या सिनेमांचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर प्रवाह पिक्चर ही वाहिनी करणार आहे. मराठी चित्रपट वाहिनीत असा प्रयोग पहिल्यांदाच होणार आहे. प्रवाह पिक्चरवर प्रीमियर्सचा हा खजिना 'पावनखिंड' या सर्वात मोठ्या ब्लॉकबस्टर सिनेमापासून सुरु होणार आहे. १९ जूनला हा धमाकेदार सिनेमा पहाता येईल. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी केली आहे. यासोबतच हेमंत ढोमे दिग्दर्शित मल्टीस्टारर 'झिम्मा' हा आणखी एक सुपरहिट चित्रपट प्रवाह पिक्चरवर पहाता येणार आहे. ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांचा 'कधी आंबट कधी गोड' आणि 'प्रवास' या दोन सिनेमांचीही या वाहिनीवर खास पर्वणी असेल. सुपरस्टार स्वप्नील जोशीचा 'बळी', महेश मांजरेकर यांचा 'ध्यानीमनी', मल्टीस्टारर आणि समीक्षकांनी प्रशंसित 'कारखानीसांची वारी' हे चित्रपटही येत्या काही आठवड्यांत प्रवाह पिक्चर वाहिनीवरुन प्रेक्षकांच्या भेटीला येतील.

## 'कोण होणार करोडपती' येणार ६ जूनपासून



सोनी मराठी वाहिनीवर 'कोण होणार करोडपती' हा कार्यक्रम येत्या ६ जूनपासून प्रेक्षकांच्या भेटीस येतोय. या कार्यक्रमातून सामान्य माणसाला आपल्या ज्ञानाच्या जोरावर करोडपती होण्याची संधी मिळते. संपूर्ण महाराष्ट्रातून या कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळतो. 'आता आलीये आपली वेळ, ज्ञान आणि मनोरंजन यांचा अद्भूत खेळ' असे या वेळच्या पर्वाचे ब्रीदवाक्य आहे. या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन पुन्हा एकदा सचिन खेडेकर करणार आहेत. हॉटसीटवर आलेल्या प्रत्येकाशी आपुलकीनी बोलून त्यांना मानसिक आधार देण्याचं महत्त्वाचं काम सचिन खेडेकर लीलया पार पाडतात. सचिन खेडेकर हे मनोरंजन क्षेत्रातले खूप मोठे नाव असल्याने ज्ञानार्जन आणि मनोरंजन या दोन्हींची ते उत्तम सांगड घालतात हे प्रेक्षकांनी पाहिलेच आहे. या कार्यक्रमात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून स्पर्धक सहभागी होत असतात. प्रत्येक स्पर्धकाचा जीवनसंघर्ष जाणून घेऊन, त्याला कार्यक्रमाची माहिती देऊन त्यांना बोलतं करून सचिन खेडेकर सूत्रसंचालकाची धुरा उत्तमरीत्या सांभाळत आहेत. प्रेक्षकांमध्येही 'कोण होणार करोडपती', या कार्यक्रमाविषयी उत्सुकता असते. हा रिॲलिटी शो ६ जूनपासून सोमवार ते शनिवार रात्री ९ वाजता दाखवण्यात येणार आहे.



## राजश्रीच्या आगामी चित्रपटातून पलोमा करणार पदार्पण

राजश्री प्रॉडक्शन राजवीर देओलला घेऊन नवा चित्रपट सुरु करीत आहे. याच चित्रपटातून पलोमा बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. चित्रपटातील राजवीरच्या नायिकेच्या भूमिकेसाठी पलोमाची निवड करण्यात आली आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रतिष्ठित चित्रपट निर्माते सूरज बडजात्या यांचा मुलगा अवनीश एस. बडजात्या करणार आहे. अवनीशही या चित्रपटाच्या माध्यमातून दिग्दर्शक म्हणून प्रथमच प्रेक्षकांसमोर येणार आहे. राजश्रीचा हा ५९ वा चित्रपट असून जुलै २०२२ मध्ये मुंबईत चित्रपटाच्या चित्रिकरणाला सुरुवात होणार आहे. चित्रपटाचे शीर्षक अजून ठरवण्यात आलेले नाही. पलोमा ही प्रख्यात अभिनेत्री पूनम ढिल्लन आणि प्रख्यात निमार्ते अशोक ठाकरिया यांची मुलगी आहे. राजवीर-पलोमा अभिनीत अवनीश दिग्दर्शित या चित्रपटात आधुनिक युगातील प्रेमकथा मांडण्यात येणार असून ही कथा एका भव्य डेस्टिनेशन वेडिंगच्या पार्श्वभूमीवर असणार आहे.

## सानिकाचा खोटारडेपणा येणार सगळ्यांसमोर

'मन उडू उडू झाल' या मालिकेने प्रेक्षकांना खिळवून ठेवलं आहे. दिपू आणि इंद्राची जोडी आणि त्यांची प्रेमकहाणी प्रेक्षकांच्या भलतीच पसंतीस पडतेय. कथेत जर खलनायक असेल तर त्याची रंजकता अजूनच वाढते. या मालिकेच्या कथानकात सध्या सानिका आणि कार्तिक हे नरकात्मक भूमिकेत दिसत आहेत. सानिका आपल्या फायद्यासाठी प्रेग्नन्ट असल्याचं नाटक करते पण तिचं हेच खोटं आता सगळ्यांसमोर येणार आहे. मालिकेत प्रेक्षकांनी पाहिलं कि देशपांडे सरांच्या घरी असलेल्या पूजेला सानिका आणि कार्तिक येतात आणि सानिका पपई खाते. त्यामुळे तिला डॉक्टरकडे घेऊन जायची लगबग सुरु होतो. सानिका डॉक्टरकडे जाण्यासाठी नकार देत असते पण तिचं न ऐकता दिपू तिला डॉक्टर कडे घेऊन जाते. डॉक्टरकडे गेल्यावर दिपूला कळतं कि सानिका प्रेग्नन्ट नाही आहे. पण ती घरी हि गोष्ट सांगत नाही. पण सानिकाची चोर ओटी भरत असताना तिला काही मोठं गिफ्ट माहेरून मिळालं नाही म्हणून ती तमाशा करते. तिचा तमाशा खूप वेळ सहन केल्यावर दिपू सगळ्यांना खरं काय आहे ते सांगते. सानिकाचा खोटारडेपणा आल्यावर तिच्या घरच्यांची काय प्रतिक्रिया असेल? हे प्रेक्षकांना लवकरच मालिकेत पाहायला मिळेल.



## तानाजी गालगुंडे म्हणतोय 'लाईन दे मला'



अनुप जगदाळे दिग्दर्शित 'भिरकीट' हा चित्रपट १७ जून रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटातील 'लाईन दे मला' हे पहिले गाणे प्रेक्षकांच्या भेटीला आले असून या गाण्यात मोनालिसा बागल आणि तानाजी गालगुंडे यांची प्रेमकहाणी सोबतच रोमँटिक डान्सही पाहायला मिळत आहे. या गाण्याला मंगेश कांगणे यांनी शब्दबद्ध केले असून या गाण्याचे बोल नकास अजीज ,आनंदी जोशी यांचे आहेत. मनाला भिडणारे 'आसवांची' आणि 'गॉगल' ही ठसकेदार लावणीही लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. चित्रपटातील सर्व गाणी मंगेश कांगणे यांनी लिहिली असून 'गॉगल' हे गाणे उर्मिला धनगर, मंगेश कांगणे यांनी गायले आहे. तर 'आसवांची' हे भावनिक गाणे शैल हाडा यांनी गायले आहे. 'भिरकीट'चे दिग्दर्शक अनुप जगदाळे म्हणतात,' हा एक धमाल विनोदी चित्रपट तर आहेच, शिवाय या चित्रपटातील गाणीही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरणारी आहेत. 'लाईन दे मला' या गाण्यात तानाजी गालगुंडे प्रथमच प्रमुख भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटाची सर्व गाणी चित्रपटाच्या कथेला अनुसरून शब्दबद्ध करण्यात आली आहेत.'

## पार्थ समथान, नीती पुन्हा एकदा एकत्र



तीन सीझन्सच्या दमदार यशानंतर 'कैसी ये यारियां' या वेबसीरिजचा आता चौथा सीझन वूट या ओटीटीवर येणार आहे. आधीच्या भागांतली माणिक (पार्थ समथान) आणि नंदिनी (नीती टेलर बावा) ही जोडी जवळपास चार वर्षांनंतर पुन्हा एकदा प्रेक्षकांसमोर येतेय. वूटने नुकतीच 'कैसी ये यारियां' या आपल्या लोकप्रिय युवा काल्पनिक शोच्या चौथ्या सीझनची घोषणा केली. पार्थ समथान, नीति टेलर बावा, किश्वर मर्चंट, अयाज खान आणि मेहुल निसार यांच्यासह इतर कलाकारही 'कैसी ये यारियां-४'मध्ये आपापल्या व्यक्तिरेखांमध्ये पुन्हा दिसणार आहेत, तर आयुष शोकीन, सागर पारेख, जान्या खांडपुरे आणि पलाश तिवारी यांनी नव्याने प्रवेश केला आहे. या चौथ्या सीझनचे कथानक, माणिक आणि नंदिनी यांच्या एकमेकांना 'हमेशा फॉरेव्हर' देण्याच्या त्यांच्या आश्वासनापलीकडे प्रवास करते. हे जोडपे त्यांचा प्रणय कायम ठेवण्यासाठी अंतर्गत आणि बाह्य अशा दोन्ही प्रकारच्या भांडणांना कसे पार करते, हा या सीझनच्या कथेचा मुख्य भाग आहे. पार्थ समथान म्हणाला, 'कोणताही शो वर्षानुवर्षे प्रासंगिक राहणे फारच कमी असते. पण या शोने एका दशकापासून असे केले आहे! हा शो देशभरातील कल्ट फॅन-फोलोइंगचा आनंद घेत आहे.' नीती टेलर बावा म्हणाली, 'मी सुरुवातीपासूनच शोचा भाग आहे आणि आम्हाला प्रेक्षकांचे भरपूर प्रेमही मिळाले आहे. या फ्रेंचायझीचा पुन्हा भाग झाल्याचे भाग्य मला लाभले.'

## नवाजुद्दीन सिद्दीकी झळकणार हॉलिवूडपटात




बॉलिवूड अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकी याला एक इंडो अमेरिकन प्रोजेक्ट मिळाला आहे ज्यामध्ये तो मुख्य भूमिकेत दिसणार आहे. रॉबर्टो गिरॉल्ट दिग्दर्शित 'लक्ष्मण लोपेझ' या ख्रिसमसवर आधारित चित्रपटात तो दिसणार आहे. या वर्षाच्या अखेरीस या चित्रपटाचे शूटिंग अमेरिकेत सुरू होण्याची शक्यता आहे. या चित्रपटाबाबत नवाजुद्दीन सिद्दीकीला विचारण्यात आले तेव्हा तो म्हणाला, 'ख्रिसमस चित्रपटात काम करणे हा सुरुवातीच्या दृष्टिकोनातून वेगळा अनुभव असेल. रॉबर्टो गिरॉल्टने कॅमेरावर आपली शक्ती आणि आज्ञा दर्शविली आहे आणि त्याने अभिनेत्याच्या विविध बाजू ज्या प्रकारे प्रकट केल्या आहेत ते खूपच मनोरंजक आहे. हे एक स्वागतार्ह आव्हान आहे ज्याची मला नेहमीच इच्छा असते. विशेषतः 'लक्ष्मण लोपेज' या चित्रपटाच्या नावाने मला उत्सुकता लागली आहे

## 'फर्स्ट सेकंड चान्स'चे पहिले गाणे दाखल

स्ट्रीटस्मार्ट प्रॉडक्शनच्या संस्थापिका आणि सीईओ लक्ष्मी आर. अय्यर यांनी नुकतीच 'फर्स्ट सेकंड चान्स' या हिंदी चित्रपटाची घोषणा केली आहे. याच सिनेमातील पहिले गाणे आज त्यांनी सोशल माध्यमांमध्ये रिलीज केले. या गाण्याचे वैशिष्ट्य म्हणजे ते सुप्रसिद्ध पार्श्वगायिका हंसिका अय्यरने गायले आहे. याआधी तिने गायलेली 'राबता' आणि 'छम्मक छल्लो' ही गाणी तुफान गाजली आहेत. यामुळे तिची एक वेगळी ओळखही बनली आहे. या गाण्याला आनंद भास्कर यांनी संगीत दिले आहे. त्यांनी यापूर्वी 'मिर्झापूर' वेबसीरिजमध्ये 'मुन्ना रॅप' आणि आयपीएल टी20 सामन्यांसाठी अधिकृत एंथमही गायले आहे. ते म्हणतात, 'फर्स्ट सेकंड चान्स' सिनेमाला संगीत देणं हा माझ्यासाठी एक आगळावेगळा अनुभव होता. मला जे मान देतात त्यांच्यासोबत काम करणं मी पसंत करतो. या सिनेमाचं संगीत करायचं हे मी त्यामुळेच नक्की केलं. या सिनेमामुळे मला दिग्दर्शिका लक्ष्मी अय्यर, केशव पार्थसारथी आणि श्रवण श्रीधर यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. 'हां जी, ना जी में उम्र गुजारी, मिलें हम अबकी बारी...' असे बोल असलेल्या या गाण्यामुळे रसुल पुक्कुटी, अनंत महादेवन आणि रेणुका शहाणे यांच्यासारखे उत्कृष्ट मित्रपरिवार मिळाला. आता हा सिनेमा कधी रिलीज होतो याची वाट बघतोय. त्यामुळे लोकही या गाण्यांचा आस्वाद घेऊ शकतील, असेही ते म्हणाले. हा सिनेमा ५ जूनला प्रदर्शित होत असून यात रेणुका शहाणे, अनंत महादेवन यांच्यासोबतच देवोलिना भट्टाचार्य, साहिल उप्पल आणि निखिल सांगा यांच्याही प्रमुख भूमिका आहेत.



# नवाकाळ शब्दकोडे-१८१



**आडवे शब्द –** १. जवळच्या भागात, शेजारीपाजारी ५. लाडिक ७. आय, उत्पन्न ९. अभिप्राय ११. कर्नाटक व तामिळनाडूतून जाणारी नदी १२. मारुती, हनुमान १३. किरकोळ, बारीकसारीक १५. अर्जुन १६. चलती, भरभराट १७. ध्येयस्थान, जिथे जायचे ते ठिकाण १९. रागावलेला २१. कष्टांना सरावलेला २३. कपोल २४. गरम, कढत २६. शेष, शिल्लक २८. संपत्ती, विष्णूची पत्नी, रमा २९. मदत करणारा, सहाय्यक ३२. आच्छादन, कव्हर ३३. अजिबात, किंचितही ३६. असूयेने होणारी चिडचिड ३८. गुन्ह्याचा संशय ४०. पैसेवाला, धनाढ्य ४२. सरस्वतीचे वाद्य ४३. आधार ४४. प्रवाह, शस्त्राची तीक्ष्ण बाजू ४५. जीभ ४६. भांडण, खुन्नस ४७. शेवट, अखेर ४८. नको त्या चौकशा, टोचणारे प्रश्न ४९. कष्ट ५०. उत्तर भारतात स्त्रियांचे लोकप्रिय व्रत ५२. वचक, दरारा ५३. भेग, चीर ५५. जनक, वडील ५६. पिशाच्च ५८. थाप मारलीच तर ती अशी असावी ६२. इच्छा, मनीषा ६४. सूर्य ६७. बाचाबाची, भांडण ६९. चिमणीचे घरटे, स्त्रियांचा अंबाडा ७१. बरोबर किंवा आसपास कोणी नसणे ७२. बाजार, मंडई ७३. मनातील इच्छा ७४. समुद्र ७५. मोठा माठ, रांजण ७६. तल्लीन ७९. नोकर ८०. रात्र, मुलींचे एक नाव ८२. सुखरूप ८५. गुरांना नियंत्रणात ठेवणारी दोरी ८६. स्त्रियांच्या कंबरेचा दागिना ८७. आक्रोश, रडणे ८८. ढगांमुळे झालेला अंधार ८९. तिमिर ९१. अकरावी तिथी, उपवासाचा एक दिवस ९२. मराठी न्याहारीतला घरी बनणारा पदार्थ ९३. प्रघात ९४. अनुरक्त ९५. छाती ९६. जिवंत ९७. धावण्याची स्पर्धा ९८. मवाळ धोरण, सौम्यपणा

**उभे शब्द –** १. दीर्घिका, नक्षत्रांचा समूह २. बरोबर, सह ३. मोदक, करंजीचे आवरण ४. धृतराष्ट्राला युद्धाचे वर्णन सांगणारा ५. तालात-लयीत असलेले ६. पंढरपूरला पायी जाणारे भक्त ७. प्रखर, तिखट ८. गर्दन ९. मोठा १०. मुलगी, पुत्री १२. डोळ्यात घालण्याचे औषध १४. समतल पृष्ठभाग १५. घर, गाव वगैरे सोडावे लागलेले १८. मऊ पोत असलेले उंची वस्त्र १९. अर्जुनाला उपदेश करणारा २०. ताठा २१. त्वचा २२. बायको २४. कडधान्याची पातळ भाजी २५. ताजा, प्रफुल्ल २६. कमतरता, न्यूनत्व २७. निरुद्योगी ३०. मोठा आवाज ३१. निद्रा ३२. कंठ, नरडे ३४. मक्षिका ३५. समाजाबद्दलचे, समाजाचे ३७. केवळ ३९. सदन ४१. पृथ्वीच्या गर्भातला उकळता द्राव ४४. निवास, सदन ४६. विचारधारा, संप्रदाय ४७. मांडी, नाटकाचा भाग ४८. बावळट ४९. ऐकणे ५१. चार रस्ते एकत्र येतात ते ठिकाण ५२. धावताना लागलेला दम ५३. फर्मान ५४. प्रथा, परंपरा ५५. मुरली ५७. दरवाजा ५८. साजूक तुपाचे पूर्वरूप ५९. सक्तीची धार्मिक कृत्ये आणि विधी ६०. शरीर, तन ६१. धोबी ६२. फोडणीचे वरण ६३. तोंडपाठ ६५. विद्यमान, सध्याचे ६६. फर्निचरसाठी तांबूस रंगाचे उंची लाकूड ६८. जास्त किंमतीचे ७०. पूर्वी भाडेकरू घरमालकाला ही एकमुठी रक्कम देत ७१अ. पडाव, नौका, मचवा ७४. प्रियकर ७६. ढोंग ७७. दुधाचा आंबटसर पदार्थ ७८. शिष्य ८०. रंगवून केलेले आकर्षक वर्णन ८१. ऐतिहासिक घटनांचे वर्णन असलेले लेखन ८२. एकाच आईची मुले ८३. जुगार ८४. शंकर, शिव ८५. समय, प्रसंग ८६. कुशाग्र बुद्धी ८७. फेकण्याजोगे ८८. 'ब्रह्मा - विष्णू - xxx' ८९. नजर साफ करणारे औषध ९०. नाराज, रुष्ट ९२. आजारी माणसासाठी केलेली पेज ९४. ग्रामीण भाषेत खूप •

**नवाकाळ कोडे क्रमांक १८० चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. गोल ४. चवदार ७. निरांजन १०. क्षय १२. जीव भांड्यात पडणे १५. हीर १६. राका १७. पती १८. कड १९. गळ २०. दावानल २२. संरक्षण २४. तारणहार २६. विरस २७. सबंध २९. तकवा ३१. झेंडा ३२. वट ३४. अज ३५. दादरा ३८. उरू ४०. वसा ४२. यव ४३. हेला ४३अ. शम ४४. कवच ४५. अकारण ४६. शिरकाव ४८.करवाल ४९. लगट ५०. कोष्टक ५२. कान ५४. टोप ५५. मान्य ५६. मंच ५९. गावकरी ६१. चक्रवाढ व्याज ६४. जखमी ६५. बाही ६६. सत्कर्म ६७. सरकी ६९. मंडळी ७०. मजनू ७१. हवेली ७२. पाटणा ७३. लड्डू ७४. उसासा ७७. फरक ७८. अवास्तव ८०. भरवसा ८२. तलखी ८४. लाचखोर ८६. गर्व ८७. अपहार ८९. लीज ९०. संकर ९२. प्रतीक ९३. टर ९६. गवती चहा ९७. कुंकुमतिलक ९८. पतकर ९९. रबडी १००. भराभर

**उभे शब्द :** १. गोजी २. लवकर ३. खंड्या ४. चपळ ५. वड ६. दाणेदार ७. निरलस ८. जरासंध ९. नकार १०. क्षपणक ११. यती १३. भांडण १४. तगर १५. हीन २१. वासव २३. क्षतज २५. हास्य २६. विडा उचलणे २८. बंदी ३०. वाट लावणे ३३. टवका ३४. अवशिष्ट ३६. दशक ३७. रामरक्षा ३८. हाकलणे ४१. सारथ्य ४३. हेका ४५. अटकाव ४७. रकमाला ५०. कोपरखळी ५१. समंजस ५३. नकली ५७. चक्र ५८. मूढ ५९. गाजरपारखी ६०. कोहीनूर ६१. चर्म ६२. वाढवेळ ६३. व्यास ६४. जडजवाहीर ६५. बाज ६८. कीटक ७०. मट्ठ ७३. लवलाही ७४. उभय ७५. सार ७६. साव ७७. फलश्रुती ७९. लाखोली ८१. सागरतीर ८३. उपटसुंभ ८५. रजनीकर ८८. हार ९०. संगत ९१. कवक ९२. प्रहार ९२अ. करंडी ९४. अंकूर ९५. पतित ९७. कुंभ

## राज ठाकरेंचा अयोध्या दौरा स्थगित

पान ३ वरून

पक्षाच्या हातात वापरले जातोय हे काही लोकांना उशिरा समजतं', भारतीय जनता पक्षानं असं त्यांच्याबाबत का करावं? हे चुकीचं आहे. यात नुकसान महाराष्ट्राच्या नेतृत्त्वाचं होतं; पण शेवटी हा विषय आमच्यापुरता आम्ही मर्यादित ठेवला. हे राजकारण आम्हाला करायचं नाही.' ज्यांचं मन साफ आहे, राजकारण नाही, मनात श्रद्धा आहे अशी कोणीही व्यक्ती अयोध्येला जाऊन रामलल्लांचे दर्शन घेऊ शकते. मात्र मी पाहिले की, काही दिवसांपासून तेथील वातावरण खूप बिघडले होते. माननीय खासदार बृजभूषण शरण सिंह यांनी त्यांच्यासमोर काही मुद्दे उपस्थित केले होते. काही प्रश्न विचारले होते, काही उत्तरे मागितली होती. ती न मिळाल्यामुळे मला असं वाटतंय की, राज ठाकरेंचा हा कार्यक्रम होऊ शकत नाही आहे. कारण लोकांच्या मनात राग आहे. आदित्य ठाकरेंच्या नेतृत्त्वात मात्र शेकडो शिवसैनिक १५ जूनला अयोध्येत जात आहेत. हा आमचा धार्मिक कार्यक्रम आहे. कोणता राजकीय किंवा शक्तिप्रदर्शनाचा नाही. आम्ही अनेकदा अयोध्येत जातो. जेव्हापासून अयोध्येचे आंदोलन सुरू झाले तेव्हापासून शिवसेना आणि अयोध्येचं एक नातं आहे. आमच्या भावना आणि श्रद्धेचा हा प्रश्न आहे. मुख्यमंत्री होण्याआधी आणि झाल्यानंतरही उद्धव ठाकरे तिथे गेले होते. यावेळी कोरोना संकट टळले असून आम्ही जात आहोत. महाराष्ट्रात रामराज्य आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत', असे ते म्हणाले. आदित्य ठाकरे या दौऱ्यात इस्कॉनच्या मंदिरालाही भेट देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## सांगली, जालन्यात वादळी पाऊस

पान ३ वरून

पाण्याखाली गेले होते. जत जिल्ह्यालाही मुसळधार पावसाने झोडपून काढले. जालन्यात वादळी वाऱ्यासह पाऊस पडला. त्यात विजेच्या तारा तुटल्यामुळे शहराचा वीजपुरवठा खंडित झाला होता. मिनी काश्मीर म्हणून ओळख असलेल्या महाबळेश्वरमध्ये आज सकाळपासून रिमझिम पाऊस पडला. तेथे गडद धुक्याची चादर पसरल्याने पर्यटकांना अनोख्या वातावरणाचा आनंद मिळाला. कोल्हापूर आणि सिंधुदुर्गमध्येही पाऊस पडला. पावसामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यात धुके पसरले होते. वेंगुर्ले, सावंतवाडी, दोडामार्ग येथेही पाऊस कोसळला. कोल्हापूरच्या कागल येथेही पाऊस झाला. त्यामुळे उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना गारव्याचा दिलासा मिळाला. रत्नागिरी आणि रायगडमध्येही पूर्वमोसमी पाऊस पडला. येथे गुरुवारी सकाळपासूनच ढगाळ वातावरण होते. पोलादपूर, महाड आणि माणगाव परिसरातही हलका पाऊस झाला. कोकणातील पावसाचा सर्वाधिक फटका आंब्याला बसला. औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण, सिल्लोड, फुलंब्री, कन्नड या तालुक्यात पाऊस झाला. जवळपास २ तास पावसाने ग्रामीण भागाला झोडपले. त्यामुळे शेतमालाचे नुकसान झाले असले तरी नागरिकांना उष्णतेच्या लाटेपासून दिलासा मिळाला आहे. पुण्यातील जुन्नर, आंबेगाव येथेही पाऊस कोसळला. वादळी वारे आणि अवकाळी पावसाने गुरुवारी सायंकाळी पंढरपूर व परिसराला चांगलेच झोडपून काढले. अचानक आलेल्या पावसामुळे बेदाणा, डाळिंब, शेवगा, केळी आदी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. द्राक्ष काढणी हंगामाला वादळी वारे आणि पावसाचा मोठा फटका बसला आहे. वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी मोठी पडझड झाल्याने शेतकरी आणि नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे.


## वाडा नगरपंचायत
### निविदा सूचना

मुख्याधिकारी वाडा नगरपंचायत खालीलप्रमाणे कामासाठी निविदा मागविण्यात येत आहे. ज्या कंत्राटदारास सदरची निविदा भरावयाची असल्यास त्यांनी त्यांची दरपत्रक खालील विभागासाठी वर्णन केल्याप्रमाणे वाडा नगरपंचायत कार्यालयात विहित कालावधीत सिलबंद लखोट्यात कार्यालयीन वेळेत सादर करावी. सदरची निविदा दि. २१/०५/२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. निविदेची अंतिम दि. ३०/०५/२०२२ रोजी पर्यंत राहील. सदरची निविदा दि.३१/०५/२०२२ रोजी संध्याकाळी ०४.०० वाजता उघडण्यात येईल.

| विभागाचे नाव | कामाचे नाव | कामाची मुदत |
|---|---|---|
| २ | ३ | ६ |
| पाणी पुरवठा विभाग | वाडा नगरपंचायत हद्दीत वार्ड क्र.१३ मध्ये बस स्टँड मागील विहिरीची दुरुस्ती करणे. | ०१ महिना |

जा.क्र.वानप/४२३
दि.२०/०५/२०२२

सही/-
मुख्याधिकारी
वाडा नगरपंचायत

## मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ
ई-निविदा सुचना क्र.का.अ. (पश्चिम)/ मुं.झो.सु.मंडळ/

### ई-निविदा सूचना

कार्यकारी अभियंता (पश्चिम) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३७, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (दुरध्वनी क्र. ०२२ ६६४०५४३२) हे जिल्हा उप निबंधक-३ (पश्चिम उपनगरे) यांचेकडे नोंदणीकृत पात्र मजूर सहकारी संस्थांकडून एकुण १९ कामाकरीता बी-१ (percentage Rate) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर **https://mahatenders.gov.in**, उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालावधी | अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री सुरू | २३/०५/२०२२ सकाळी १०:३० वाजता | २ | निविदा विक्री बंद | ०६/०६/२०२२ संध्याकाळी ६.१५ वाजता |
| ३ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | ०८/०६/२०२२ सकाळी १०:३० नंतर | ४ | आर्थिक बोली उघडण्याचा दिनांक | ०९/०६/२०२२ सकाळी १०:३० नंतर |

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.
टिप : १. विस्तृत ई- निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.
टिप : २. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.

सही/-
कार्यकारी अभियंता (प),
मुं.झो. सु.मंडळ, मुंबई

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
सीपीआरओ/ए/२४९

## PUBLIC NOTICE

This is to inform to the general public that Bank of Baroda,Bhandup (West) Branch intends to accept the under mentioned property standing in the name of **Mrs. Smita Bipinchandra Patel and Mr. Dharmesh B. Patel** as a security for a loan/credit facility requested.

In case anyone has got any right/title/ interest/claims over the under mentioned property, they are advised to approach the Bank within 10 days along with necessary proof to substantiate their claim.

If no response is received within 10 days, it is presumed that the property is free of any charge/claim/encumbrance and Bank shall proceed with the mortgage

**SCHEDULE**

**FLAT NO.2201**, on the 22nd floor,in the building known as "**One ICC**", in Iceland City Centre, situated at G. D. Ambedkar Marg, Dadar(East), Mumbai-400 014, alongwith two car parking Units, to be constructed on all that piece of parcel of land bearing CS no. 223, lying, being and situated at **Dadar Naigaon Division**, in the Registration District and Sub District of Mumbai City and within the limits of Municipal corporation of Greater Mumbai.

**Manish D. Tiwari & Associates**
Advocate High Court
Office No. 101 & 102,Shree Krishna Park, Soparkar House,Raghoba Shankar Road, Chendani, Thane West- 400607
Mob- 9619302138

## PUBLIC NOTICE

This is to give notice to the public at large that Mr. Kiran Raghunath Naik and Mrs. Dipa Kiran Naik have agreed to mortgage property viz. **Flat No. B-1**, on the Ground floor, **B Wing,** adm. 570 sq.ft. (Carpet area) i.e. 52.97 sq.mtrs (Built-up), in the society known as **Madhuswapna Co-operative Housing Society Limited,** situated at Patil Pada, Kulgaon (East), Tal. Ulhasnagar, Dist.: Thane, land bearing City Survey No. 519 to 524 & 526 to 527, lying, being and situated at **Village: Kulgaon**, Badlapur, Taluka : Ambernath, Dist: Thane, to be purchased by them, in favour of our client Bank of India, Mulund (East) Branch.

This is to further give notice that the chain document viz. Agreement for Sale dated 09.05.1991 (Reg. Sr.no. UHN-3082-1991 dated 10.05.1991) executed by and between Mr. Pandurang Gopal Ghorpade (Patil) "The Owner" and Mr. Shantaram Ramchandra Telavane "The Purchaser", of said property was misplaced by the owners.

Any persons either having or claiming any right, title, interest or claim in the property, possession of the said property in any manner whatsoever and is having possession of said documents, is required to make the same known to the undersigned in writing within 7 days from the date of publication hereof either by hand delivery against proper written acknowledgment of the undersigned or by the Registered post A.D.

Failing which any such claim shall be deemed to be waived and/or abandoned and thereafter the transaction may be completed at any time and it is presumed that the property is free of any charge/claim / encumbrance and Bank shall proceed with the mortgage.

**Dated this 21st day of May, 2022**

**Manish D. Tiwari & Associates**
Advocate High Court
Office No. 101 & 102,Shree Krishna Park, Soparkar House,Raghoba Shankar Road, Chendani, Thane West- 400607
(022- 25320001 Mob- 9619302138

## जाहीर सुचना

आम्ही **मे. अरिहंत सुपरस्ट्रक्चर्स लि.,** सर्वसाधारण जनतेस कळवू इच्छितो की महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने आमच्या स. न.३७, ४०/१ आणि ४०/२ गाव कोयनावेले तालुका पनवेल जिल्हा रायगड, प्रकल्पाला दिनांक १२ मे २०२२, रोजी पत्र क्रमांक **SIA/MH/MIS/228850/2021 and EC Identification No.EC22B038MH188526.** पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून मान्यता दिली आहे. सदर मान्यता पत्राची प्रत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयामध्ये तसेच पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या http://parivesh.nic.in/ संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**मे. अरिहंत सुपरस्ट्रक्चर्स लि.**

## जाहीर सुचना

आम्ही **मे. अरिहंत आशियाना प्रा. लि.,** सर्वसाधारण जनतेस कळवू इच्छितो की महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने आमच्या स. न.५२/३३क, गाव भिसेगाव, तालुका कर्जत जिल्हा रायगड, प्रकल्पाला दिनांक १२ मे २०२२, रोजी पत्र क्रमांक **SIA/MH/MIS/228079/2021 and EC Identification No.EC22B038MH150048.** पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून मान्यता दिली आहे. सदर मान्यता पत्राची प्रत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयामध्ये तसेच पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या http://parivesh.nic.in/ संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**मे. अरिहंत आशियाना प्रा. लि.**

## जाहीर सुचना

आम्ही **मे. अरिहंत वाटिका रिअल्टी प्रा. लि.,** सर्वसाधारण जनतेस कळवू इच्छितो की महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने आमच्या स. न. ३६/१, ३५/४, ३३/२, गाव कोयनावेले, तालुका पनवेल जिल्हा रायगड,प्रकल्पाला दिनांक १२ मे २०२२, रोजी पत्र क्रमांक **SIA/MH/MIS/241915/2021 and EC Identification No. EC22B038MH192748** पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून मान्यता दिली आहे. सदर मान्यता पत्राची प्रत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयामध्ये तसेच पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या http://parivesh.nic.in/ संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**मे. अरिहंत वाटिका रिअल्टी प्रा. लि.**

## जाहीर सुचना

आम्ही **मे. अरिहंत वाटिका रिअल्टी प्रा. लि.,** सर्वसाधारण जनतेस कळवू इच्छितो की महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने आमच्या स. न.६७ ही. ६/१, ६/२, ४/५ + ६, ६/४, ही. ५, ही. ३/७, ३/८, स.नं. ६८, ६९, स.नं. ४ ही. अ/१,, गाव जुवेली, तालुका अंबरनाथ, जिल्हा ठाणे,, प्रकल्पाला दिनांक १२ मे २०२२, रोजी पत्र क्रमांक **SIA/MH/MIS/241893/2021 and EC Identification No. EC22B038MH193438** पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून मान्यता दिली आहे. सदर मान्यता पत्राची प्रत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयामध्ये तसेच पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या http://parivesh.nic.in/ संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**मे. अरिहंत वाटिका रिअल्टी प्रा. लि.**

## मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)

**बृहन्मुंबईतील ५८ बंद/ आजारी गिरण्यांमधील गिरणी कामगारांच्या घरांकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांचेकडून म्हाडाकडे उपलब्ध झालेल्या २५२१ सदनिकांच्या सोडतीबाबत.**

### जाहीर सूचना

बृहन्मुंबईतील ५८ बंद/आजारी गिरण्यांमधील गिरणी कामगारांच्या घरांकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांचेकडून म्हाडाकडे उपलब्ध झालेल्या **२५२१** सदनिकांकरिता महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे सोडत काढण्याचे प्रस्तावित आहे. सोडतीकरिता प्राप्त सदनिकांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | सोडत काढावयाच्या सदनिकांचा पत्ता | प्राप्त झालेल्या सदनिका | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| १. | मे.टाटा हाऊसिंग कं. लि. रांजनोळी, जिल्हा ठाणे | १२४४ | ३२० चौ. फुट (१६० चौ. फुटाच्या २ सदनिका) |
| २. | श्री. विनय अगरवाल शिलोटर, रायचूर, जिल्हा रायगड | १०१९ | ३२० चौ. फुट (१६० चौ. फुटाच्या २ सदनिका) |
| ३. | मे. सान्वो व्हिलेज, कोल्हे, ता. पनवेल, जिल्हा रायगड | २५८ | ३२० चौ. फुट (१६० चौ. फुटाच्या २ सदनिका) |
| | एकूण | २५२१ | |

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांचेकडून उपलब्ध झालेल्या २५२१ सदनिकांकरिता म्हाडातर्फे बृहन्मुंबईतील ५८ बंद/आजारी गिरण्यांमधील शिल्लक गिरणी कामगार/वारसांकरिता प्रस्तावित सोडतीसाठी सहभागी करण्यात येणाऱ्या अर्जदारांची प्रारुप यादी म्हाडाचे संकेतस्थळ **https://mhada.gov.in** वर प्रसिध्द करण्यात आली होती. सदर यादीबाबत काही आक्षेप/हरकती असल्यास **दिनांक २८/०४/२०२२ ते दिनांक २९/०४/२०२२** कार्यालयीन वेळेत उपमुख्य अधिकारी/ धापुप्र/गिरणी/मुंबई मंडळ, कक्ष क्र.२०४, पहिला मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ येथे व्यक्तीशः कार्यालयामध्ये उपस्थित राहून व तसेच ई-मेल आय.डी. **mhadamillworkerltr-2021@gmail.com** वर पुराव्या व ओळखपत्रासह लेखी निवेदन सादर करण्याबाबत आवाहन करण्यात आले होते.

त्या अनुषंगाने व्यक्तीशः कार्यालयामध्ये उपस्थित राहून व तसेच ई-मेल द्वारे प्राप्त झालेल्या आक्षेप/हरकतींसह सादर केलेल्या पुराव्यानुसार प्रारुप यादीमध्ये योग्य त्या दुरुस्त्या करुन वरील २५२१ सदनिकांच्या संगणकीय सोडतीसाठी अंतिम यादी निश्चित करण्यात आली आहे. सदर अंतिम यादी म्हाडाचे संकेतस्थळ **https://mhada.gov.in** वर गिरणी निहाय प्रसिध्द करण्यात आली आहे.

ज्या गिरणी कामगार/वारसांची नावे सारखी आहेत परंतू गिरणी संकेत क्रमांक, जन्म तारीख, तिकिट क्रमांक, सेवा कालावधी, ESIC क्रमांक तसेच इत्यादी तपशील मिळता जुळता नाही, असे गिरणी कामगार/ वारस वेगवेगळे असल्याचे गृहित धरुन अशा अर्जदारांचा प्रस्तावित सोडतीच्या यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे. असे गिरणी कामगार/वारस सोडतीमध्ये यशस्वी झाल्यास व कागदपत्र पडताळणीवेळी अथवा भविष्यात सदनिका वितरणाच्या कोणत्याही टप्प्यामध्ये अशा गिरणी कामगार/वारसांनी एकापेक्षा जास्त अर्ज केल्याचे निदर्शनास आल्यास दुबार/तिबार अर्जांपैकी एक अर्ज रद्द करण्यात येईल. **तसेच प्रसिध्द करण्यात येणाऱ्या अंतिम यादीवर आक्षेप/हरकतींचा विचार करण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.**

शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले निर्णय/परिपत्रक/आदेशानुसार सोडतीमध्ये यशस्वी ठरलेल्या अर्जदारांची पात्र/अपात्रता निश्चित करण्यात येवून नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

सही/-
**(डॉ. योगेश म्हसे)**
मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई

CPRO/A/252

**म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था**

## SBI
### भारतीय स्टेट बँक
कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई – ४०००२१

**सूचना**

भागधारकांच्या हे निदर्शनास आणून दिले जात आहे की एसबीआयच्या रु. १० दर्शनी मूल्याच्या भागाचे रु. १ मध्ये विभाजन झाल्याच्या अनुषंगाने, बँकेद्वारे निर्गमित केलेल्या रु. १० दर्शनी मूल्य असलेल्या भाग प्रमाणपत्रांची वैधता दिनांक २२ नोव्हेंबर २०१४ पासून समाप्त झाली आहे. याविषयीची अधिसूचना भारतीय राजपत्रात दिनांक ०५.११.२०१४ या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली होती. या अनुषंगाने सर्व हेतूंकरिता, या सूचनेत दिले गेलेले भाग तपशील हे रु. १ दर्शनी मूल्य असणाऱ्या भाग प्रमाणपत्रांचे आहेत. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की बँकेच्या खालील नमूद केलेल्या प्रतिभूतींचे भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) यथायोग्य पूर्ण झालेल्या हस्तांतरण विलेखा (विलेखां) सह / शिवाय, उक्त भाग/ बॉण्डचे यथाविधि नोंदणीकृत धारक/ धारकांकडून हरवली/ गहाळ झाली आहेत आणि त्यांनी त्यांच्या नावे प्रतिलिपी भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याकरिता बँकेकडे अर्ज केला आहे. उक्त भाग/ बॉण्डसंबंधी कोणत्याही व्यक्तीचा दावा असल्यास त्यांनी तो दावा बँकेचे ट्रान्स्फर एजंट मेसर्स अलंकित असाईनमेंट्स लिमिटेड, २०५–२०८, अनारकली कॉम्प्लेक्स, झंडेवालन एक्स्टेंशन, नवी दिल्ली – ११००५५ (इमेल आयडी: **sbi.igr@alankit.com**) यांच्याकडे या दिवसापासून ७ दिवसांच्या आत दाखल करावा, अन्यथा पुढील सूचनेशिवाय बँक प्रतिलिपी भाग बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु करेल.

**भारतीय स्टेट बँक**

| अनु क्र. | फोलियो क्र. | धारकाचे नाव | समभाग संख्या | प्रमाणपत्र क्रमांक | | विभिन्न क्रमांक | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासून | पर्यंत | पासून | पर्यंत |
| १ | ०७५१४९०७ | ओम प्रकाश भुतडा | १४० | ६३१४९५१ | ६३१४९५१ | ८०६११०६६७४ | ८०६११०६८१३ |
| २ | ०१८४१०५३ | अनंत लक्ष्मी प्रत्तीपती | ५०० | १५६४५६ | १५६४५६ | ७४२४९५०४७१ | ७४२४९५०९७० |
| ३ | ०११२२३२३ | दर्शन गुप्ता<br>गिरधर गुप्ता | ५०० | ११७३१८ | ११७३१८ | ७४०४९४२४४१ | ७४०४९४२९४० |
| ४ | ००८०२७२३ | सुनिल कुमार सिंह<br>संध्या सिन्हा | ६३० | ६२८७८ | ६२८७९ | ७३८८४२१६९१ | ७३८८४२२३२० |
| ५ | ००८१३६६३ | सोम नाथ | ५०० | ६८०५९ | ६८०५९ | ७३८९७५०५४१ | ७३८९७५१०४० |
| ६ | ०१८९५८७५ | नर्मदेश्वर ओझा<br>पुष्पा ओझा<br>अंशु अभिराम | ५०० | १६१८४८ | १६१८४८ | ७४२७७००६८१ | ७४२७७०११८० |
| ७ | ०११०४०११ | शारदा नायक<br>निर्मला नायक | ५०० | ११६१७६ | ११६१७६ | ७४०४३७२८८१ | ७४०४३७३३८० |
| ८ | ०२५९२७२५ | ग्लेन जी डीमेल्लो | ५०० | २०२७९७ | २०२७९७ | ७४४८७८७६९१ | ७४४८७८८१९० |
| ९ | ००७३३९३४ | एलिक्सो मार्सिलिनो डी मेलो<br>ग्लेन गॅब्रिएल डीमेल्लो<br>रचन डीमेल्लो | ९२० | ३८२०० | ३८२०१ | ७३८२४६९४८१ | ७३८२४७०४०० |
| १० | ०१९०५८१४ | मारिया रोझा जे पी डिमेल्लो | ६०० | १६३१७८ | १६३१७८ | ७४२८३७०४५१ | ७४२८३७१०५० |
| ११ | ०७४२१९५४ | जोस जुस्टुस<br>अचम्मा जोस | ११० | ६२२२१६६ | ६२२२१६६ | ८०१५१६०५८९ | ८०१५१६०६९८ |
| १२ | ०१६७९०२१ | फ्रान्सिस पी फायगर | ५०० | १५१२६४ | १५१२६४ | ७४२२३२८९११ | ७४२२३२९४१० |
| १३ | ००९०९१०७ | एडविन अल्बर्ट | ३० | १०३००४ | १०३००४ | ७३९८३७०९६१ | ७३९८३७०९९० |
| १४ | ०७५१०२२९ | एम व्ही सुर्य प्रताप | १९६ | ६३१०२८८ | ६३१०२८८ | ८०६००७६९५८ | ८०६००७७१५३ |
| १५ | ००८१४९५५ | श्रवण कुमार राणा<br>श्रीमती सिता देवी | ३० | ६८४९२ | ६८४९२ | ७३८९८५७५४१ | ७३८९८५७५७० |
| १६ | ००७८८६३४ | शैलेश जोशी<br>स्मिता बेन शैलेश जोशी | ३० | ५७७७३ | ५७७७३ | ७३८७१७८७५१ | ७३८७१७८७८० |
| १७ | ०७५१४८६४ | कृष्ण देवी गुप्ता | १४० | ६३१४९०८ | ६३१४९०८ | ८०६१०९३९६२ | ८०६१०९४१०१ |

**वरील आकडे रु. १/- दर्शनी मूल्याच्या वर्तमान समभागांच्या समभाग विभाजनानंतरचे (अभिलेख तारीख २१.११.२०१४) तपशील दर्शवतात.**

स्थळ: मुंबई
दिनांक: २१.०५.२०२२

समभागांची संख्या: ६३२६
स.प्रमाणपत्रांची संख्या: १९

महाव्यवस्थापक
(शेअर्स व बॉण्ड्स)

नवा काळ

मुंबई ■ शनिवार २१ मे, २०२२ ■ पान- ८

उद्या वाचा

नवा काळ विजय

एका सुरक्षित कायद्याचा 'गर्भपात' - रेणुका कल्पना



फ्रान्सच्या पंतप्रधानपदी महिला

जगातील सर्वात 'दयाळू' न्यायाधीश...



# चंद्रपूरमध्ये डिझेलचा टँकर व ट्रकची टक्कर होऊन आग! ९ होरपळून ठार

■ चंद्रपूर

**चंद्रपूर-मूल** रोडवरील अजयपूर येथे गुरुवारी रात्री १०.३० च्या सुमारास डिझेलचा टँकर आणि लाकडाने भरलेला ट्रक यांची समोरासमोर टक्कर होऊन भीषण अपघात झाला. त्यानंतर दोन्ही वाहनांनी पेट घेतल्याने उसळलेल्या आगडोंबात ९ जण होरपळून ठार झाले. त्यांची ओळख पटलेली नाही, अशी माहिती चंद्रपूरचे विभागीय पोलीस अधिकारी सुधीर नंदनवार यांनी दिली.



डिझेलचा टँकर चंद्रपूर-मूल मार्गावरून जात होता. काल रात्री १०.३० च्या सुमारास तो चंद्रपूरजवळच्या अजयपूर गावाजवळ आला तेव्हा समोरून येणाऱ्या लाकडांच्या ट्रकने त्याला धडक दिली. नंतर दोन्ही वाहनांना आग लागली. त्यांचे टायर फुटल्यामुळे ही आग आणखी भडकली. त्यात ९ जणांचा होरपळून मृत्यू झाला. त्यांची ओळख पटलेली नाही. या अपघाताचा तपास सुरू आहे. अपघातातील मृतांची ओळख पटवण्याचेही काम सुरू आहे, असे पोलिसांनी सांगितले. अपघात आणि वाहनांना लागलेल्या आगीमुळे येथील वाहतूक काहीकाळ विस्कळीत झाली होती.

# खटावचा जवान मंदार नलवडेवर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

■ सातारा

**खटाव** जवळच्या वेटणे गावातील मंदार नलवडे या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या जवानावर बुधवारी रात्री उशिरा शोकाकूल वातावरणात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी जमलेले नातेवाईक आणि ग्रामस्थांनी त्यांना साश्रू नयनांनी अखेरचा निरोप दिला. नलवडे कर्तव्यावर असताना त्यांचे हृदयविकाराने निधन झाले होते. सातारा जिल्ह्यातील खटाव जवळच्या वेटणे गावातील मंदार नलवडे १२ वर्षांपासून केंद्रीय औद्योगिक दलात शिपाई म्हणून काम करत होते. नवी मुंबईतील न्हावा-शेवा बंदरात ड्युटीवर असताना बुधवारी सकाळी ५ वाजता त्यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यात त्यांचे निधन झाले. सायंकाळी त्यांचा मृतदेह त्यांच्या वेटणे या त्यांच्या मूळगावी नेला. तेथे रात्री उशिरा त्यांच्यावर सरकारी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. सातारा पोलीस दलाच्या जवानांनी त्यांना मानवंदना दिली.

# टीव्हीवरील महिलांनी चेहरा झाकावा तालिबानचे नवे फर्मान जारी

■ काबूल

**तालिबान** महिलांच्या स्वातंत्र्यावर अंकुश ठेवणारे अनेक आदेश तालिबानकडून निघत असतानां, आता अफगाणिस्तानमधील तालिबान सरकारने महिलांबाबत आणखी एक नवे फर्मान जारी केले आहे. तालिबानने म्हटले आहे की टीव्ही चॅनेलवर दिसणाऱ्या सर्व महिला अँकरना कार्यक्रमाच्या प्रसारणादरम्यान त्यांचे चेहरे झाकावे लागतील. 'टोलो न्यूज'च्या वृत्तानुसार, तालिबानच्या माहिती आणि संस्कृती मंत्रालयाने हा आदेश जारी केला आहे.

तालिबानने म्हटले आहे की हे फर्मान अंतिम आहे आणि ते बदलता येणार नाही. टोलो न्यूज आणि इतर अनेक टीव्ही आणि अफगाणिस्तानातील सर्व माध्यमांना हा आदेश जारी करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले आहे. अफगाणिस्तानातील इतर माध्यम संस्थांमध्येही हा आदेश लागू करण्यात येत आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

अफगाणिस्तानमधील एका स्थायी माध्यम अधिकाऱ्याने सांगितले की, त्यांच्या चॅनेललाही असाच आदेश मिळाला असून त्यावर चर्चेला कोणताही वाव ठेवण्यात आलेला नाही. दरम्यान, अनेक महिला टीव्ही अँकरने त्यांचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. ज्यामध्ये त्या अँकरिंग करताना त्यांचे चेहरे मास्कने झाकलेले दिसत आहेत.

# राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवारांची ब्राह्मण महासंघाने भेट नाकारली

■ मुंबई

**राष्ट्रवादी** काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी उद्या सायंकाळी ब्राह्मण महासंघाला भेटीसाठी आमंत्रित केले होते. मात्र शरद पवार यांची भेट ब्राह्मण महासंघाने नाकारत मोठा धक्का दिला आहे. उद्या सायंकाळी शरद पवार यांचा पुण्यातील निसर्ग मंगल कार्यालयात कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाला राज्यातील विविध ब्राह्मण संस्थांना आमंत्रित करण्यात आले होते. मात्र ब्राह्मण महासंघाने शरद पवार यांचे निमंत्रण नाकारले आहे. ब्राह्मण महासंघाचे आनंद दवे यांनी म्हटले की, मिटकरी यांनी वक्तव्य केल्यानंतर शरद पवारांना मेलद्वारे पत्र पाठवले होते. त्या पत्रात त्यांना हे जातीय राजकारण राज्यात होत आहे ते थांबले पाहिजे असे म्हटले होते. मात्र त्याच्याच दुसऱ्या दिवशी शरद पवारांच्या उपस्थितीत छगन भुजबळ यांनी ज्योतिषी, पुरोहित धंदा करतात म्हटले. त्यांना व्यवसाय हा शब्द वापरता आला असता तो का नाही वापरला. पवारांनीही बोलताना शाहू महाराज, ज्योतिषी अशी काही उदाहरणे दिली होती आणि कळत न कळत मिटकरी, भुजबळांच्या वक्तव्याचे समर्थन केले. त्यानंतर त्यांना भेटून काही अर्थ नाही. मिटकरी, भुजबळ यांच्या वक्तव्यावर पवारांचे विचार काय हे त्यांनी स्पष्ट करावे.

# वीजनिर्मिती कंपन्यांची थकबाकी केंद्राचा ६ राज्यांना इशारा

■ नवी दिल्ली

**केंद्र** सरकारने देशातील वीजनिर्मिती कंपन्या आणि कोळसा कंपन्यांची कोट्यवधी रुपयांची थकबाकी असलेल्या ६ राज्यांना इशारा दिला आहे. या राज्यांच्या मुख्य सचिवांना केंद्रीय ऊर्जा सचिवांनी पत्र लिहून लवकरात लवकर ही थकबाकी भरण्यास सांगितले आहे. तसे न झाल्यास या राज्यांच्या वीजपुरवठ्यात गंभीर समस्या निर्माण होऊ शकते, असा इशारा त्यांनी पत्रातून दिला आहे. सहा राज्यांची एकूण थकबाकी सुमारे ७५,००० कोटी रुपये इतकी आहे.

सर्वाधिक थकबाकी तामिळनाडू राज्याची आहे. वीजनिर्मिती कंपन्यांचे २०,८४२ कोटी रुपये आणि कोल इंडिया लिमिटेडचे ७२९ कोटी रुपये तामिळनाडूवर आहेत. त्यानंतर क्रमांक लागतो तो महाराष्ट्राचा. राज्याकडे वीजनिर्मिती कंपन्यांचे १८,०१४ कोटी रुपये आणि कोल इंडिया लिमिटेडचे २,५७३ कोटी रुपये आहेत. तर राजस्थान सरकारकडे वीज कंपन्यांचे ११,१७६ कोटी



रुपये आणि कोळसा कंपनीचे ३०७ कोटी रुपये थकीत आहेत. उत्तर प्रदेशकडे वीज कंपन्यांचे ९,३७२ कोटी रुपये आणि कोळसा कंपन्यांचे ३१९ कोटी रुपये आहेत. तसेच जम्मू-काश्मीरकडे ७,२७५ कोटी रुपये आणि मध्य प्रदेशकडे ५,०३० कोटी रुपये थकीत आहेत. दरम्यान, ऊर्जा सचिवांच्या मते, वीज कंपन्या आणि कोळसा कंपन्यांची थकबाकी भरण्याची जबाबदारी ही राज्य सरकारची आहे.

# 'देवतिगे सलाम' विधीतून 'सलाम' हटवा चेलुवनारायण मंदिर प्रशासनाची मागणी

■ बंगलोर

**कर्नाटकातील** मुजराई विभागाला प्रसिद्ध चेलुवनारायण स्वामी मंदिर प्रशासनाकडून संध्याकाळी होणाऱ्या विधीचे नाव 'देवतिगे सलाम' वरून 'संध्या आरती' करण्याचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. कर्नाटकातील मंदिरांचे व्यवस्थापन करणाऱ्या मुझराई विभागाकडे मंड्या जिल्ह्यातील मेलकोट येथील प्रसिद्ध चेलुवनारायण स्वामी मंदिर प्रशासनाकडून प्रस्ताव पाठवण्यात आला असून, या प्रस्तावानुसार, दररोज संध्याकाळी होणाऱ्या विधीचे नाव बदलून 'देवतिगे सलाम' वरून 'संध्या आरती' करण्याची मागणी करण्यात आली आहे. या संदर्भात मंदिराचे पुजारी, पदाधिकारी व परिचारक यांच्या उपस्थितीत बोलावण्यात आलेल्या बैठकीमध्ये 'देवतिगे सलाम'ला 'संध्या आरती' असे नाव द्यावे, अशी सूचना यावेळी करण्यात आली आहे. मात्र अनेक वर्षांपासून ऐतिहासिक चेलुवनारायण स्वामी मंदिराचे पुजारी संध्याकाळी ७ वाजता 'देवतिगे सलाम' करत आहेत. मात्र 'सलाम' या पर्शियन शब्दावर आक्षेप घेत, मंड्या जिल्हा धार्मिक परिषदेने पर्शियन शब्द काढून टाकून त्याच्या जागी 'संध्या आरती' हा पारंपारिक संस्कृत शब्द वापरण्यासाठी जिल्हा प्रशासनाला निवेदन सादर केले. जिल्हा प्रशासनाने धार्मिक परिषदेकडून आलेले निवेदन मुजराई विभागाकडे पाठवले आहे.

# वादळी पावसाने बिहारचे जनजीवन विस्कळीत

■ पाटणा

**देशाच्या** विविध भागात उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना आता पूर्वमोसमी पावसामुळे दिलासा मिळत आहे. मात्र काही ठिकाणी नागरिकांना पावसामुळेच समस्यांना सामोरे जावे लागतेय. बिहारमध्ये गुरुवारी वादळी पावसाने कहर केला. पावसामुळे घडलेल्या विविध दुर्घटनांमध्ये राज्यातील २५ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये मुझफ्फरपूरमधील पाच, भागलपूरमधील चार, लखीसराय-सारणमधील प्रत्येकी तीन, मुंगेरमधील दोन आणि जमुई, बांका, बेगुसराय, खगडिया,

**२५ जणांचा मृत्यू**



पूर्णिया, नालंदा, जेहानाबाद व अररिया येथील प्रत्येकी एकाचा समावेश आहे. दरम्यान, पाटण्यातील मणेर येथे वाळू वाहून नेणाऱ्या पाच बोटी गंगेत बुडाल्या. त्यात जवळपास ५० मजूर होते. त्यांनी पोहून आपला जीव वाचवला.

बिहारमध्ये गुरुवारी पाटणा, समस्तीपूर, बेगुसराय आणि बगहामध्ये दुपारनंतर अचानक वातावरण बदलले. २५ ते ६० किमी प्रतितास वेगाने वादळ आले आणि पाहता पाहता मुसळधार पाऊस कोसळू लागला. हळूहळू राजधानी पाटण्यातील वीजपुरवठा ठप्प झाला. बगहा आणि शिवहरमध्ये तुफान वाऱ्याने जनजीवन विस्कळीत झाले. अनेक ठिकाणी कच्ची घरे आणि झाडे उन्मळून पडली. वाहतुकीवर मोठा परिणाम झाला. आंबा, लिची, मका, मूग, भाजीपाला पिकांचे मोठे नुकसान झाले. दरम्यान, राज्यात अजूनही पावसाचा अंदाज असल्याने पाटणा हवामान केंद्राने यलो अलर्ट जारी केला असून लोकांना सुरक्षित ठिकाणी राहण्याचा सल्ला दिला आहे.

# सोलापुरात एसटीचा भीषण अपघात खराब रस्त्यामुळे थेट शेतात पलटली

■ सोलापूर

**सोलापूर** जिल्ह्यात एसटी बसला भीषण अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. एसटी बस चालकाचे खराब रस्त्यामुळे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि हा अपघात झाला असल्याची माहिती समजते आहे. ही बस अक्कलकोटहून कल्लाप्पावाडीकडे जात होती आणि त्याच दरम्यान एसटीला अपघात झाला. एसटी बस रस्त्यावरुन थेट शेजारील शेतात जाऊन पलटी झाली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

अक्कलकोट तालुक्यातील कल्लाप्पावाडी येथे ही एसटी



बस जात होती. या बसमध्ये एकूण ४५ ते ५० प्रवाशी प्रवास करत होते. खराब रस्त्यामुळे एसटी बस चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि एसटी थेट शेतात जाऊन पलटली. अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी तात्काळ स्थानिकांनी मदतीसाठी धाव घेतली. स्थानिकांच्या मदतीने घटनास्थळी बचाव आणि मदतकार्य सुरू करण्यात आले होते. सुदैवाने या अपघातात कुठलीही जीवितहानी झालेली नाहीये. तर अपघातात जखमी झालेल्यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# सेन्सेक्स १५०० अंकानी वधारला

■ मुंबई

**आठवड्यातील** शेवटच्या दिवशी आज शेअर मार्केटमध्ये पहिल्या सत्रापासूनच तेजी दिसून आली. शेअर मार्केट आज तेजीसह उघडला आणि तेजीसह बंद झाला. आज शेअर बाजाराच्या शेवटच्या सत्रात सेन्सेक्स १५०० अंकाच्या तेजीसह ५४,३०० वर बंद झाला तर निफ्टी ४५० अंकाच्या तेजीसह १६,२०० वर बंद झाला. आठवड्याच्या शेवटच्या दिवशी शेअर बाजारातील घसरणीला ब्रेक लागला. कमकुवत जागतिक संकेतांमुळे काल भारतीय बाजारात विक्रीचा दबाव दिसून आला होता. व्यवहाराच्या शेवटी, सेन्सेक्स १४१६.३० अंकांनी अर्थात २.६१ टक्क्यांनी घसरून ५२,७९२.२३ वर बंद झाला होता. दुसरीकडे, निफ्टी ४३०.९० अंकांनी म्हणजेच २.६५ टक्क्यांनी घसरून १५,८०९.४० वर बंद झाला होता.

# मोईन अलीची एकहाती झुंज राजस्थानला १५१ धावांचे लक्ष्य

■ मुंबई

**आयपीएल** २०२२ मधील आजच्या ६९ व्या सामन्यात चेन्नई सुपरकिंग्सच्या मोईने अलीने ९३ धावा ठोकूनही संघाला मोठी धावसंख्या उभी करता आली नाही. राजस्थान रॉयल्सला विजयासाठी केवळ १५१ धावांचे लक्ष्य होते.

राजस्थान रॉयल्स आणि चेन्नई सुपरकिंग्स सामन्यात धोनीने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. एक मोठी धावसंख्या करण्याची त्यांची रणनीती होती. पण राजस्थानने भेदक गोलंदाजी केल्यामुळे चेन्नईचा संघ २० षटकांत केवळ १५० धावाच करू शकला. चेन्नईचा सलामीवीर ऋतुराज गायकवाड स्वस्तात बाद झाला. कॉन्वेही १६ धावा करण्यातच यशस्वी झाला. मोईने अलीने सुरुवातीपासून दमदार फलंदाजी सुरू ठेवली. पण त्याला खास कोणाचीच साथ मिळाली नाही. केवळ धोनीने २६ धावांची खेळी केली. इतर फलंदाज दुहेरी आकडेवारीही गाठू शकले नाहीत. त्यामुळे मोईन अलीच्या ९३ धावांच्या जोरावर चेन्नई १५० धावाच करू शकली.

# सचिन वाझेचा जामीन फेटाळला

**मुंबई-** अंबानींच्या घराबाहेर स्फोटके आणि मनसूख हिरेन हत्येसह खंडणीप्रकरणी अटकेत असलेला बडतर्फ पोलीस निरीक्षक सचिन वाझेचा जामीन अर्ज आज मुंबई सत्र न्यायालयाच्या विशेष पीएमएलए कोर्टाने फेटाळून लावला आहे. त्यामुळे वाझेच्या अडचणीत वाढ झाली आहे. या प्रकरणी ईडीकडून तपास पूर्ण झाला असून आरोपपत्रही दाखल करण्यात आले आहे. तसेच या प्रकरणात आपल्याला अटक करण्यात आलेली नाही त्यामुळे जामीन देण्यात यावा, अशी मागणी करणारा अर्ज वाझेने कोर्टात दाखल केला होता. माजी गृहमंत्री देशमुखांच्या कथित प्रकरणात वाझेचाही तेवढाच सहभाग आहे, असे सांगत ईडीने विरोध केला.

# इंद्राणी मुखर्जीची तुरुंगातून सुटका

■ मुंबई

**शीना** बोरा हत्याकांड प्रकरणात इंद्राणी मुखर्जी आरोपी आहे. विशेष सीबीआय न्यायालयाने दोन दिवसांपूर्वीच तिला जामीन मंजूर केला होता. आज मुखर्जीची भायखळा तुरुंगातून सुटका झाली. शीना बोरा हत्याकांडात गेल्या साडेसहा वर्षांपासून तुरुंगात असलेल्या इंद्राणीला दोन लाख रुपयांच्या व्यक्तिगत हमीपत्रावर विशेष सीबीआय कोर्टाने जामीन मंजूर केला होता. त्यानंतर इंद्राणी आज बाहेर आली. मला खूप आनंद झाला असल्याची प्रतिक्रिया तिने तुरुंगातून बाहेर आल्यानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना दिली.

# पेगॅसस हेरगिरीच्या चौकशी समितीला सुप्रीम कोर्टाची २० जूनपर्यंत मुदतवाढ

■ नवी दिल्ली

**बहुचर्चित** पेगॅसस हेरगिरी प्रकरणाची चौकशी करणाऱ्या समितीला चौकशी पूर्ण करून त्याचा अहवाल सादर करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने आज २० जून २०२२ पर्यंत मुदतवाढ दिली.

इस्त्राईलच्या पेगॅसस सॉफ्टवेअरचा वापर करून केंद्र सरकारने प्रतिष्ठित व्यक्ती, राजकीय नेते, पत्रकार, न्यायमूर्ती, सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती यांची हेरगिरी केल्याचा आरोप आहे. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी संसदेच्या पावसाळी अधिवेशनात हा मुद्दा लावून धरला होता. त्यामुळे संसदेचे कामकाज होऊ शकले नाही. त्यानंतर या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्या होत्या. हा मुद्दा राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित असल्याने केंद्राला प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सर्वोच्च न्यायालयाने सांगितले होते. या प्रकरणाच्या चौकशीसाठी ३ तज्ज्ञांची समिती नेमली आहे. या समितीला चौकशी पूर्ण करून अहवाल सादर करण्यासाठी आज सर्वोच्च न्यायालयाने २० जूनपर्यंत मुदतवाढ दिली.

# धक्का लागलेल्या महिला पोलिसाला सक्तीच्या रजेवर का पाठवले?

■ मुंबई

**संदीप देशपांडेंचा सरकारला सवाल**

**मशिदीवरील** भोंग्यांविरोधात झालेल्या आंदोलनात मनसेचे सरचिटणीस संदीप देशपांडे आणि संतोष धुरी यांना अटक करताना हे दोघेही पोलिसांच्या तावडीतून निसटले. त्यावेळी तेथे उपस्थित असलेल्या महिला पोलिसाला धक्का लागून त्या खाली कोसळल्या होत्या. या प्रकरणी देशपांडे यांच्यावर गुन्हा नोंदविण्यात आला होता. मात्र आता त्यांना अटकपूर्व जमीन मंजूर झाल्यांनतर आपल्यावरील सर्व आरोप फेटाळत त्या महिला पोलीस आमच्या धक्क्याने जमिनीवर कोसळल्या नसल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. दरम्यान, मनसेचे सरचिटणीस संदीप देशपांडे यांचा सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केल्यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेतली. त्यांनी यावेळी संपूर्ण प्रकरणावर भाष्य केले. त्या खोट्या गुन्ह्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील पोलीस आम्हाला शोधत होते. आमच्यावर खोटा गुन्हा दाखल करण्यात आला होता हे तुमच्या फुटेजमुळे स्पष्ट झाले. हे स्क्रीनशॉट आमच्या वकिलांनी न्यायालयात दाखवले. त्यामुळे कोणत्याही प्रकारचा गुन्हा घडला नव्हता हे स्पष्ट झालं. आपल्यावरील गुन्ह्याबाबत बोलताना संदीप देशपांडे यांनी स्पष्ट केले की, त्या महिला पोलिसाला आमचा कुठलाही धक्का लागला नव्हता.

